# औरंगाबाद महानगरपालिका औरंगाबाद

## दिनांक ३१/१२/२००७ रोजी संपन्न झालेल्या स्थायी समिती सभेचे (का.प.क्र.१३) इतिवृत्त

मंगळवार दिनांक **३१ डिसेंबर २००७** रोजी मा.सभापती **श्री. त्र्यंबक गणपतराव तुपे** यांचे अध्यक्षतेखाली स्थायी समितीची सभा, महानगरपालिका मुख्य कार्यालयातील 'मलिक अंबर स्थायी समिती सभागृह' येथे **दुपारी ३.०५ वाजता** "वंदे मातरम्" या गिताने सुरू झाली. या सभेस मा.आयुक्त, नगर सचिव व अधिकारी वर्गासह खालील सन्माननीय सभासद उपस्थित होते.

1. श्री. मधुकर दामोधर सावंत
2. श्री. संजय पांडूरंग शिरसाट
3. श्री. हिंमतराव साळूबा दाभाडे
4. श्री. अ. रशीद खान (मामु)
5. डॉ. आशा बिनवडे
6. श्रीमती जयश्री सारंग किवळेकर
7. श्री. मोहन मेघावाले
8. श्री. कचरू विश्वनाथ मोरे
9. श्री. मो. जावेद मो. इसाक
10. श्री. अ. साजेद अ. सत्तार

**संवाद :**

मा.सभापती : कोरम नाही त्यामुळे सभा दुपारी 5.00 वाजेपर्यत तहकूब करण्यात येते.
**(सभा तहकूब दु.3.10 वा., पुन्हा सभेला सुरूवात सायं.5.40 वाजता)**

श्री.मो.जावेदमो.इसाक : मा. विरोधी पक्ष नेता यांच्या चुलती, पै.अमीना बेगम म.इसाक यांचे नुकतेच दु:खद निधन झालेले आहे त्यांना सभागृहातर्फे श्रध्दाजंली अर्पण करण्यात यावी.

श्री.मधुकर सावंत
श्री.अ.रशिद खान : यास आमचे अनुमोदन आहे.

मा.सभापती श्रध्दांजलीसाठी सर्वांनी उभे रहावे.
(यावेळी पै.अमीना बेगम म.इसाक यांना सभागृहातर्फे 02 मिनिटे स्तब्ध उभे राहून श्रध्दाजंली अर्पण करण्यात आली.)

**विषय क्र. 251 :**

दि.**23/10/2007**(का.प.क्र.10) रोजी संपन्न झालेल्या स्थायी समिती सभेचे इतिवृत्त कायम करणे.

**संवाद :**

डॉ.आशा बिनवडे : माझ्या वार्डातील शाळेचे आरआरसी छत पाडून ठेवले. मागिल बैठकीत या संदर्भात चर्चा झालेली होती काम सुरू करणार होते, ते होत नाही म्हणून दोन शिफ्ट मध्ये शाळा भरवावी लागते.

मा.सभापती : संबधीत अधिकारी आज सभेला नाही पूढील बेठकीत खुलासा मिळेल.

श्री.मधुकर सावंत : 54 कोटीच्या रस्त्याचे कामाचे टेंडर रिकॉल करणार होते ते केले का?

अति.शहर अभियंता : प्रथम जेंव्हा निविदा काढली त्यावेळी एकच निविदा प्राप्त झाली स्पर्धा झालेली नव्हती. त्यामूळे ती निविदा रद्द करून फेर निविदा काढण्यात आल्या पुढील कार्यवाही चालू आहे.

श्री.मधुकर सावंत : कोणत्या वृत्तपत्रात निविदाची जाहिरात आलेली होती.

श्री.अ.साजेद अ.सत्तार : स्थायी समितीची बैठक झाली त्याचे दुस-याच दिवशी फेर निविदा वृत्तपत्रात आले. किती निविदा आल्या, स्पर्धा झाली का, अगोदरच्या निविदा मोठ्या पेपरला का आलेले नव्हते, कुणाची चूक आहे? जे कुणी जबाबदार असतील त्यांचेवर कार्यवाही होणार का.

अति.शहर अभियंता : प्रथम वेळेस तीन निविदा उघडल्या होत्या. एका निविदेमध्ये एकच निविदा होती दोन निविदेमध्ये एकही नव्हते. ज्या एक निविदेमध्ये एकच गुत्तेदाराचे टेंडर आले त्यात स्पर्धा न झाल्याने फेर निविदा काढण्यात आल्या. दै.लोकमत, सकाळ दैनिकात दिलेले होते. दुस-यांदा जेंव्हा निविदा दिली त्यात 3-4 निविदा आलेले आहे. आता स्पर्धा झालेली आहे.

मा.सभापती : 54 कोटीच्या फेर निविदा काढलेल्या असून त्या कामाच्या निविदा आल्या आता स्पर्धा झालेली आहे. तसा खुलासा अधिकारी यांनी केला. इतिवृत्त कायम करण्यास सर्वानुमते मान्यता देण्यात येते.

**ठराव :**

दिनांक **23/10/2007** रोजी संपन्न झालेल्या स्थायी समिती सभेचे इतिवृत्त कायम करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

**विषय क्र. 252 :**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, प्रभाग क्र.11 अंतर्गत मेडीकल कॉलेज हॉस्पीटल परिसरात फुटपाथ तयार करणे या कामाचे अंदाजपत्रक सा.बां.खात्याच्या सन 2006-07 च्या दरसुचीनुसार रक्कम रू.11,97,400/- चे तयार करण्यात आलेले आहे. या कामाचा खर्च 2007-08 या आर्थिक वर्षात शहर सौंदर्यीकरण या लेखाशिर्षातून करण्यात येत आहे. सदर कामाच्या अंदाजपत्रकास प्रशासकीय मान्यता प्राप्त झालेली आहे.

तरी रक्कम रू.11,97,400/- चे अंदाजपत्रकाचा प्रस्ताव मंजुरीस्तव व विचारार्थ सादर.

**संवाद :**

श्री.हिम्मतराव दाभाडे : हे काम करण्या अगोदर अतिक्रमण हटविण्याची गरज आहे. फुटपाथचे काम झाल्यानंतर, मोठया प्रमाणात हातगाडया चहाच्या टप-या रस्त्यावर लागतात. आजही क्रांतीचौक ते बाबा पेट्रोल पंप रस्त्याच्या कडेला फुटपाथवर मोठया प्रमाणात अतिक्रमण झालेले आहे.

मा.सभापती : फुटपाथच्या जागेवर अतिक्रमण असेल तर ते अगोदर काढावे त्यानंतर काम करण्यात यावे. जेथे अतिक्रमण झालेले असेल ते तात्काळ काढण्याची कार्यवाही करावी. पुन्हा अतिक्रमण होणार नाही याची काळजी घ्यावी.

श्री.मधुकर सावंत : सायंकाळी 5 वाजेनंतर प्रशासकीय विभागाचे काम बंद होते. कर्मचारी घरी जातात, त्यानंतर शहरात चौकात मोठमोठया रहदारीच्या रस्त्यावर 90 टक्के हातगाडया, टपऱ्या लागतात. क्रांतीचौक ते गुलमंडी, गजानन महाराज मंदीर समोरील रस्त्यावर तसेच इतर शहरात मोठमोठया रस्त्यावर हातगाड्या उभ्या असल्याच्या दिसून येतात. अतिक्रमण या विषयावर विशेष बैठक आयोजित करण्यात यावी.

श्री.अ.रशिद खान : रहदारीला अडथळा होत असेल तर ही जबाबदारी पोलीस विभागाची सुध्दा आहे तसे मनपा प्रशासनाने पत्र द्यावे. अलंकार हॉटेलच्या बाजूला शेख मसद याचे बांधकाम चालू असतांना आपले कर्मचा-यांनी परवानगी ची मागणी केली असता महापालिकेकडे काय रेकॉर्ड आहे तेच दाखववे म्हणून त्यांनी पोलीस स्टेशनला जावून तक्रार केली. पोलीस विभगाला बांधकाम परवानगीची कागदपत्रे मागण्याचा अधिकार नाही चुकीच्या पध्दतीने कार्यवाही होते ॲक्शन घ्यावी.

श्री.अ.साजेद अ.सत्तार : ज्या त्या पोलीस स्टेशनच्या हद्दीत अतिक्रमण होत असेल तर त्या पोलीस स्टेशनचे पीआय यांना संबधीत अतिक्रमण करणा-यावर गुन्हा दाखल करता येतो का? असा शासनाचा जी.आर. आलेला आहे का?

विधी सहाय्यक :अतिक्रमणाच्या बाबत संबधीत पोलीस स्टेशन, वार्ड अधिकारी, इमारत निरीक्षक, यांची जबाबदारी निश्चित केलेली आहे तसे शासनाचे जीआर आहे.

श्री.अ.साजेद अ.सत्तार : पोलीस स्टेशनचे अधिकारी यांची दखल घेत नाही त्यासाठी मा.आयुक्त यांनी त्यांना पत्र देवून सदर शासनाच्या जीआरची प्रतसहीत माहिती पाठवावी.

डॉ.आशा बिनवडे : शासनाच्या या जीआरची प्रत सर्व सदस्यांनाही द्यावी.

मा. सभापती : प्रशासनाने पोलीस स्टेशनला शासनाच्या जीआरची प्रत सोबत जोडून तसे पत्र द्यावे. प्रस्ताव मंजूर करण्यात येतो.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे प्रभाग क्र.11 अंतर्गत मेडीकल कॉलेज हॉस्पीटल परिसरात फुटपाथ तयार करणे या कामासाठी तयार करण्यात आलेल्या रक्कम रू.11,97,400/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. 253 :**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, वॉर्ड क्र.39 अंतर्गत राजाबाजार, कुंवारफल्ली, जाधवमंडी व खाराकुँवा येथील विविध रस्त्यांचे डांबरीकरण करणे या कामाचे अंदाजपत्रक सा.बां.खात्याच्या सन 2006-07 च्या दरसूचीनुसार रक्कम रू.19,95,601/- चे तयार करण्यात आलेले आहे. या कामाचा खर्च 2007-08 या आर्थिक वर्षात पुनःडांबरीकरण या लेखाशिर्षातून करण्यात येत आहे. सदर कामाच्या अंदाजपत्रकास प्रशासकीय मान्यता प्राप्त झालेली आहे.

तरी रक्कम रू.19,95,601/- चे अंदाजपत्रकाचा प्रस्ताव मंजुरीस्तव व विचारार्थ सादर.

मा. सभापती : प्रस्ताव क्र.253 ते 273 मंजूर करण्यात येतात.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे वॉर्ड क्र.39 अंतर्गत राजाबाजार, कुंवारफल्ली, जाधवमंडी व खाराकुँवा येथील विविध रस्त्यांचे डांबरीकरण करणे या कामासाठी तयार करण्यात आलेल्या रक्कम रू.19,95,601/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. 254 :**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, प्रभाग क्र.80 अंतर्गत प्रभागामधून जाणाऱ्या 24 मी. रूंद रस्त्याचे डांबरीकरण करणे या कामाकरीता सा.बां. खात्याच्या सन 2006-07 च्या दरसूचीनुसार रक्कम रू.19,95,400/- चे अंदाजपत्रक तयार करण्यात आलेले आहे. या कामाचा खर्च सन 2007-08 या आर्थिक वर्षात नवीन डांबरी रस्ते या लेखाशिर्षाखाली करण्यात आलेला आहे.

तरी रक्कम रू.19,95,400/- च्या अंदाजपत्रकाचा प्रस्ताव मंजुरीस्तव तथा विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे प्रभाग क्र.80 अंतर्गत प्रभागामधून जाणाऱ्या 24 मी. रूंद रस्त्याचे डांबरीकरण करणे या कामाकरीता तयार करण्यात आलेल्या रक्कम रू.19,95,400/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. 255 :**

अतिरिक्त शहर अभियंता, महानगरपालिका आरंगाबाद यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, प्रभाग क्र.86 प्रियदर्शनी इंदिरानगर गारखेडा येथील विविध गल्ल्यांमध्ये पेव्हर ब्लॉक बसविणेच्या कामाचे सा.बां. खात्याच्या सन 2006-07 च्या दरसूचीनुसार अंदाजपत्रकरक्कम रू.13,00,000/- चे तयार करण्यात आलेले आहे. या कामाचा खर्च सन 2007-08 या आर्थिक वर्षात 'स्लम नवीन कॉंक्रीट रस्ते' या लेखाशिर्षामधून करण्यात येत आहे. सदर अंदाजपत्रकास मा.आयुक्त यांनी शिफारसकेली आहे व स्थायी समिती सभेसमोर सादर करण्याचे आदेशीत केले आहे.

तरी अंदाजपत्रक रक्कम रू.13,00,000/- चा प्रस्ताव मंजुरीस्तव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे प्रभाग क्र.86 प्रियदर्शनी इंदिरानगर गारखेडा येथील विविध गल्ल्यांमध्ये पेव्हर ब्लॉक बसविणेच्या कामासाठी तयार करण्यात आलेल्या रक्कम रू.13,00,000/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. 256 :**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, प्रभाग क्र.36 नोगश्वरवाडी येथील खडकेश्वर, कोतवालपुरा, काबरा गार्डन व इतर विविध रस्त्यावर फुटपाथ बांधणे बाबतच्या कामासाठीचे जिल्हा दरसुची 2006-07 नुसार अंदाजपत्रक रक्कम रू.13,36,276/- चे तयार करण्यात आले असून त्यास दि.9/8/2007 नुसार प्रशासकीय मान्यता झालेली आहे.

सदर कामासाठी अर्थसंकल्प 2007-08 मध्ये नवीन कॉंक्रीट रस्ते शहरी भाग या लेखाशिर्षका अंतर्गत पान क्र.W-125 अ.क्र.60 ते 62 नुसार 14.00 लक्ष ची तरतुद उपलब्ध आहे.

करीता सदर कामाचे अंदाजपत्रक रक्कम रू.13,36,276/- चा प्रस्ताव विचारार्थ तथा मान्यतेस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे प्रभाग क्र.36 नोगश्वरवाडी येथील खडकेश्वर, कोतवालपुरा, काबरा गार्डन व इतर विविध रस्त्यावर फुटपाथ बांधणे बाबतच्या कामासाठी तयार करण्यात आलेल्या रक्कम रू.13,36,276/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. 257 :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, वॉर्ड क्र.17 श्रीकृष्णनगर फरशी मैदानात बॅडमिंटन हॉल बांधणे करीता सा.बां.विभाग सन 2006-07 च्या जिल्हा दरसुचीनुसार रक्कम रू.14,99,900/- चे अंदाजपत्रक तयार करण्यात आले असून त्यास मा.आयुक्त यांनी स्थायी समितीकडे सादर करणेस्तव शिफारस केलेली आहे.

सदरील कामाचा खर्च सन 2007-08 अंतर्गत व्यापारी संकुले व इतर इमारती या लेखाशिर्षा अंतर्गत करण्यात येईल. त्यानुसार उपरोक्त कामाचे अंदाजपत्रक रक्कम रू.14,99,900/- चा प्रस्ताव मान्यतेस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे वॉर्ड क्र.17 श्रीकृष्णनगर फरशी मैदानात बॅडमिंटन हॉल बांधणेच्या कामाकरीता तयार करण्यात आलेल्या रक्कम रू.14,99,900/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. 258 :**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केलेला आहे की, प्रभाग क्र.88 अंतर्गत तंत्रनगर, टिळकनगर, गुरूकुल सो., श्रीरामनगर, व्यंकटेश कॉलनी, विश्वभारती कॉलनी, विनायक आदर्श अंतर्गत रस्त्यांचे पुनःर्डांबरीकरण करणे या कामाकरीता सा.बां.खात्याच्या सन 2006-07 च्या दरसुचीनुसार रक्कम रू.14,98,000/- चे अंदाजपत्रक तयार करण्यात आलेले आहे. या कामाचा खर्च सन 2007-08 या आर्थिक वर्षातपुनःर्डांबरीकरण या लेखाशिर्षाखाली करण्यात येणार आहे.

तरी रक्कम रू.14,98,000/- च्या अंदाजपत्रकाचा प्रस्ताव मंजुरीस्तव तथा विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे प्रभाग क्र.88 अंतर्गत तंत्रनगर, टिळकनगर, गुरूकुल सो., श्रीरामनगर, व्यंकटेश कॉलनी, विश्वभारती कॉलनी, विनायक आदर्श अंतर्गत रस्त्यांचे पुनःर्डांबरीकरण करणे या कामाकरीता तयार करण्यात आलेल्या रक्कम रू.14,98,000/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

**विषय क्र. 259 :**

अतिरिक्त शहर अभियंता प्रस्ताव सादर करीत आहेत की, वॉर्ड क्र.87 अंतर्गत आदीत्यनगर, बहिवाळ क्लिनीक ते परीमल एसटीडी राजाज कॉर्नर ते सद्भावना अपार्टमेंट येथे पेव्हींग ब्लॉक बसविणे या कामाचे अंदाजपत्रक सा.बां.खात्याच्या सन 2006-07 च्या दरसुचीनुसार तयार करण्यात आले असून कामाची अंदाजपत्रकीय रक्कम रू.13,96,309/- इतकी आहे. सदरील अंदाजपत्रकास मा.आयुक्त यांची प्रशासकीय मान्यता झाली असून या कामाचा खर्च नवीन कॉंक्रीट रस्ते(शहर) या लेखाशिर्षा खाली पृष्ठ क्र.164 अ.क्र.13, 20 ते 22 वर उपलब्ध तरतुदीमधून प्रस्तावित आहे.

सदरील काम वॉर्ड क्र.87 अंतर्गत आदीत्यनगर, बहिवाळ क्लिनीक ते परीमल एसटीडी राजाज कॉर्नर ते सद्भावना अपार्टमेंट येथे पेव्हींग ब्लॉक बसविणे या कामासाठी अं.प.रक्कम रू.13,96,309/- चा प्रस्ताव मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे वॉर्ड क्र.87 अंतर्गत आदीत्यनगर, बहिवाळ क्लिनीक ते परीमल एसटीडी राजाज कॉर्नर ते सद्भावना अपार्टमेंट येथे पेव्हींग ब्लॉक बसविणे या कामासाठी तयार करण्यात आलेल्या रक्कम रू.13,96,309/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. 260 :**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केलेला आहे की, प्रभाग क्र.89 ज्योतीनगर मध्ये 15.00 मी. विकास योजना रस्त्यालगत पेव्हर ब्लॉक बसविणे या कामाचे अंदाजपत्रक सा.बां. खात्याच्या सन 2006-07 च्या दरसुची प्रमाणे तयार करण्यात आलेले असून कामाचे अंदाजपत्रक रक्कम रू.14,89,000/- चे आहे. या कामाचा समावेश सन 2007-2008 च्या अर्थसंकल्पात नवीन कॉंक्रीट रस्ते या लेखाशिर्षाखाली करण्यात आलेला आहे.

तरी रक्कम रू.14,89,000/- च्या अंदाजपत्रक मंजुरीस्तव प्रस्ताव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे प्रभाग क्र.89 ज्योतीनगर मध्ये 15.00 मी. विकास योजना रस्त्यालगत पेव्हर ब्लॉक बसविणे या कामासाठी तयार करण्यात आलेल्या रक्कम रू.14,89,000/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. 261 :**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, प्रभाग क्र.17 पवार हॉस्पीटल ते एम-2 रोड, एन-9 मनपा शाळा ते दुर्गा हॉटेल पर्यंतच्या रस्त्याचे पुनःडांबरीकरण करणे या कामाचे अंदाजपत्रक सा.बां.खात्याच्या सन 2006-07 च्या दरसूचीनुसार रक्कम रू.19,96,100/- चे तयार करण्यात आलेले आहे. या कामाचा खर्च 2007-08 या आर्थिक वर्षात पुनःडांबरीकरण या लेखाशिर्षातून करण्यात येत आहे. सदर कामाच्या अंदाजपत्रकास प्रशासकीय मान्यता प्राप्त झालेली आहे.

तरी रक्कम रू.19,96,100/- चे अंदाजपत्रकाचा प्रस्ताव मंजुरीस्तव व विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे प्रभाग क्र.17 पवार हॉस्पीटल ते एम-2 रोड, एन-9 मनपा शाळा ते दुर्गा हॉटेल पर्यंतच्या रस्त्याचे पुनःडांबरीकरण करणे या कामासाठी तयार करण्यात आलेल्या रक्कम रू.19,96,100/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. 262 :**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केलेला आहे की, वॉर्ड क्र.25 अयोध्यानगर येथे विविध रस्त्यांचे डांबरीकरण करणे या कामाचे अंदाजपत्रक सा.बां.खात्याच्या सन 2006-07 च्या दरसुचीनुसार रक्कम रू.12,98,100/- चे तयार करण्यात आलेले आहे. या कामाचा खर्च 2007-08 या आर्थिक वर्षात पुनःडांबरीकरण या लेखाशिर्षातून करण्यात येत आहे. सदर कामाच्या अंदाजपत्रकास प्रशासकीय मान्यता प्राप्त झालेली आहे.

तरी रक्कम रू.12,98,100/- चे अंदाजपत्रकाचा प्रस्ताव मंजुरीस्तव व विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे वॉर्ड क्र.25 अयोध्यानगर येथे विविध रस्त्यांचे डांबरीकरण करणे या कामासाठी तयार करण्यात आलेल्या रक्कम रू.12,98,100/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. 263 :**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केलेला आहे की, वॉर्ड क्र.88 जयविश्वभारती कॉलनी अंतर्गत मुख्य रस्यावर पाणी साचणाऱ्या भागाची दुरूस्ती करणे या कामाकरीता सा.बां.खात्याच्या सन 2006-07 च्या दरसूचीनुसार रक्कम रू.12,15,500/- चे अंदाजपत्रक तयार करण्यात आलेले आहे. या कामाचा खर्च सन 2007-08 या आर्थिक वर्षात रस्ते दुरूस्ती व पॅचवर्क या लेखाशिर्षाखाली करण्यात आलेला आहे.

तरी रक्कम रू.12,15,500/- च्या अंदाजपत्रकाचा प्रस्ताव मंजुरीस्तव तथा विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे वॉर्ड क्र.88 जयविश्वभारती कॉलनी अंतर्गत मुख्य रस्यावर पाणी साचणाऱ्या भागाची दुरूस्ती करणे या कामाकरीता तयार करण्यात आलेल्या रक्कम रू.12,15,500/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. 264 :**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केलेला आहे की, वॉर्ड क्र.1 हर्सूल ते जमनज्योती येथे रस्त्यांचे पुनःडांबरीकरण करणे या कामाचे अंदाजपत्रक सा.बां. खात्याच्या सन 2006-07 च्या दरसूचीनुसार रक्कम रू.14,91,000/- चे तयार करण्यात आलेले आहे. या कामाचा खर्च सन 2007-08 या आर्थिक वर्षात पुनःडांबरीकरण या लेखाशिर्षातून करण्यात येत आहे. सदर कामांतर्गत एकूण

1000 मी. लांब व साधारणपणे 3.50 मी. रूंद रस्त्याचे डांबरीकरण करण्यात येणार आहे. या कामाच्या अंदाजपत्रकास मा.आयुक्त यांनी शिफारस करून स्थायी समितीची मान्यता घेणेस्तव आदेशीत केलेले आहे.

त रक्कम रू.14,91,100/- चे अंदाजपत्रकाचा प्रस्ताव मंजुरीस्तव व विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे वॉर्ड क्र.1 हर्सूल ते जमनज्योती येथे रस्त्यांचे पुनःडांबरीकरण करणे या कामासाठी तयार करण्यात आलेल्या रक्कम रू.14,91,100/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. 265 :**

कार्यकारी अभियंता, पाणी पुरवठा विभाग यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, औरंगाबाद पाणी पुरवठा योजनेच्या देखभाल व दुरूस्ती करीता आवश्यक असलेले विविध व्यासाचे स्कोअर व्हॉल्व, स्लुस व्हॉल्व, एअर व्हॉल्व चा पुरवठा करण्याचे अंदाजपत्रक महाराष्ट्र जीवन प्राधिकरण मंडळाच्या सन 2006-07 च्या दरसुची नुसार तयार करण्यात आले असून अंदाजपत्रकीय रक्कम रू.10,35,660/- इतकी आहे. अंदाजपत्रकीय प्रस्ताव स्थायी समितीच्या मंजुरीस्तव सादर करण्याबाबत मा.आयुक्त यांनी शिफारस केली आहे.

आर्थिक वर्ष 2007-08 च्या अर्थसंकल्पात जायकवाडी जलवाहिनी देखभाल व दुरूस्ती या लेखा शिर्षकाखाली एकत्रित तरतुद करण्यात आली आहे. करीता अंदाजपत्रक रू.10,35,660/- चा प्रस्ताव विचारार्थ व मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे औरंगाबाद पाणी पुरवठा योजनेच्या देखभाल व दुरूस्ती करीता आवश्यक असलेले विविध व्यासाचे स्कोअर व्हॉल्व, स्लुस व्हॉल्व, एअर व्हॉल्व चा पुरवठा करण्याकरीता तयार करण्यात आलेल्या रक्कम रू.10,35,660/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. 266 :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, पोलीस अधिक्षक, अँटी करप्शन ब्युरो, औरंगाबाद यांनी त्यांचेकडील पत्र जा.क्र.सीआर/100/औरंगाबाद/2007/3882, दि.30.11.2007 नुसार आरोपी लोकसेवक श्री.बाळकृष्ण रखमाजी कोरडे, कनिष्ठ लिपिक, वॉर्ड-क कार्यालय, महानगरपालिका औरंगाबाद यांचे विरूध्दची लाचलुचपतीची सापळा केस प्रकरणी त्यांचे विरूध्द मा.न्यायालयात अभियोग लावण्यासाठी परवानगी मागितलेली आहे. पत्रासोबत सदरच्या प्रकरणाच्या तपासाचे संपूर्ण कागदपत्रांच्या नकलांचा संच पाठविलेला आहे. सर्व कागदपत्रे बारकाईने तपासली आहेत. संबंधीत श्री.बाळकृष्ण रखमाजी कोरडे, कनिष्ठ लिपीक यांच्याविरूध्द मा.न्यायालयात अभियोग लावण्यासाठी पुरेसा पुरावा दिसून येत असल्याने संबंधीताविरूध्द मा.न्यायालयात अभियोग लावण्याबाबत परवानगी देण्याचा प्रस्ताव विचारार्थ व मान्यतेस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे पोलीस अधिक्षक, अँटी करप्शन ब्युरो, औरंगाबाद यांना आरोपी लोकसेवक श्री.बाळकृष्ण रखमाजी कोरडे, कनिष्ठ लिपिक, वॉर्ड-क कार्यालय, महानगरपालिका औरंगाबाद यांचे विरूध्दची लाचलुचपतीची सापळा केस प्रकरणी, त्यांचे विरूध्द मा.न्यायालयात अभियोग लावण्यास परवानगी देण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. 267 :**

संदर्भ :- 1) कार्यालयीन आदेश मनपा/मआ/स्वीस/डीपी/2004/301, दि.28.6.2004.
2) मा. स्थायी समिती ठराव क्र.171, दिनांक 13/1/2005.
3) कार्यालयीन आदेश मनपा/मआ/स्वीस/डीपी/2005/39, दि.24.1.2005.

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, औरंगाबाद महानगरपालिकेची विकासात्मक कामे सत्वरतेने व नियोजनात्मकरित्या होण्यासाठी आयुक्त, महानगरपालिका, औरंगाबाद हे मुंबई प्रांतिक मनपा अधिनियम 1949 चे कलम (69) 1 अन्वये त्यांना प्राप्त झालेल्या अधिकारानुसार रूपये 2.50 लाख (रूपये दोन लाख पन्नास हजार)आर्थिक मर्यादे पर्यंतच्या कार्यालयीन कामांना प्रशासकीय मंजुरी देणे व आर्थिक खर्चास मंजुरी देण्याचे अधिकार तसेच मुंबई प्रांतिक मनपा अधिनियम 1949 चे कलम 73 अन्वये महानगरपालिकेतर्फे करावयाच्या रूपये 2.50 लक्ष पर्यंतच्या करारनामा करून देण्यासंदर्भाचे अधिकार शहर अभियंता, अतिरिक्त शहर अभियंता, कार्यकारी अभियंता(पाणी पुरवठा), कार्यकारी अभियंता(विद्युत व ड्रेनेज) यांना संदर्भ क्र.1 अन्वये अधिकार प्रदान करण्यात आले होते.

तथापी, त्यानंतर कार्यालयीन आदेश क्र. मनपा/आस्था-1/04/1448, दिनांक 21/9/2004 अन्वये शहर अभियंता पदाची श्रेणीवाढ करून अधिक्षक अभियंता पदनामाच्या वेतनश्रेणीत वाढ करण्यात आली. तसेच शहर अभियंता हे मनपा आस्थापनावरील अतिरिक्त शहर अभियंता, कार्यकारी अभियंता(पाणी पुरवठा), कार्यकारी अभियंता(विद्युत व ड्रेनेज) यांचे समन्वय नियंत्रण अधिकारी व प्रभाग प्रमुख असल्या कारणाने संदर्भ क्र.1 अन्वये देण्यात आलेले अधिकार काढून घेऊन ते अधिकार संदर्भ क्र.2 अन्वये स्थायी समितीने दिलेल्या मंजूरीनुसार शहर अभियंता यांना प्रदान करण्यात आले होते.

आता दिनांक 31/10/2007 रोजी शहर अभियंता हे सेवानिवृत्त झालेले असल्याने आणि कार्यालयीन आदेश क्र.मनपा/शअ/522/2007 दिनांक 31/10/2007 नुसार अतिरिक्त शहर अभियंता, कार्यकारी अभियंता(पाणी पुरवठा), कार्यकारी अभियंता(विद्युत व ड्रेनेज) हे आयुक्त यांचे अधिपत्याखाली काम करीत आहेत.

करीता प्रस्ताव सादर करण्यात येतो की, आयुक्त महानगरपालिका औरंगाबाद हे मुंबई प्रांतिक मनपा अधिनियम 1949 चे कलम (69) 1 अन्वये त्यांना प्राप्त झालेल्या अधिकारानुसार रूपये 2.50 लाख (रूपये दोन लाख पन्नास हजार) आर्थिक मर्यादेपर्यंतच्या कार्यालयीन कामांना प्रशासकीय मंजुरी देणे व आर्थिक खर्चास मंजुरी देण्याचे अधिकार तसेच मुंबई प्रांतिक मनपा अधिनियम 1949 चे कलम 73 अन्वये महानगरपालिकेतर्फे करावयाच्या रूपये 2.50 लक्ष पर्यंतच्या करारनामा करून देण्यासंदर्भाचे अधिकार अतिरिक्त शहर अभियंता, कार्यकारी अभियंता(पाणी पुरवठा), कार्यकारी अभियंता(विद्युत व ड्रेनेज), महानगरपालिका, औरंगाबाद यांना देण्याबाबतचा प्रस्ताव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे औरंगाबाद महानगरपालिकेची विकासात्मक कामे सत्वरतेने व नियोजनात्मकरित्या होण्यासाठी, रूपये 2.50 लाख (रूपये दोन लाख पन्नास हजार) आर्थिक मर्यादेपर्यंतच्या कार्यालयीन कामांना प्रशासकीय मंजुरी देणे व आर्थिक खर्चास मंजुरी देण्याचे अधिकार तसेच मुंबई प्रांतिक मनपा अधिनियम 1949 चे कलम 73 अन्वये महानगरपालिकेतर्फे करावयाच्या रूपये 2.50 लक्ष पर्यंतच्या करारनामा करून देण्यासंदर्भाचे अधिकार अतिरिक्त शहर अभियंता, कार्यकारी अभियंता(पाणी पुरवठा), कार्यकारी अभियंता(विद्युत व ड्रेनेज), महानगरपालिका, औरंगाबाद यांना देण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. 268 :**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केलेला आहे की, विजयचौक ते कालीकामाता मंदिर 50 फुट विकास योजना रस्त्याचे खडीकरण व डांबरीकरण करणे या कामासाठी तयार करण्यात आलेल्या रक्कम रू.19,98,776/- च्या अंदाजपत्रकास स्थायी समितची मंजुरी प्राप्त असून या कामासाठी निविदा मागविल्या असता एकूण 5 निविदापत्रके विकली गेली व निविदा स्विकृतीच्या अंतिम तारखेपर्यंत यापैकी 3 निविदापत्रके दर भरून प्राप्त झाली. प्राप्त निविदापत्रके उघडण्यात आली असता खालीलप्रमाणे दर प्राप्त झाले आहेत.

| | | |
|---|---|---|
| 1. | राजेंद्रसिंग अजितसिंग | 4.50%कमी दराने |
| 2. | मॉस्कॉट कन्स्ट्रक्शन | 15.99% जास्त दराने |

3. आदीनाथ कन्स्ट्रक्शन 41.00% जास्त दराने

वरील प्राप्त निविदा पत्रकापैकी राजेंद्रसिंग अजितसिंग यांचे दर तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी व अं.प.दरापेक्षा 4.50% ने कमी आहेत. यास मा.आयुक्त यांनी शिफारस करून प्रस्ताव स्थायी समितीसमोर सादर करण्याचे आदेशीत केलेले आहे.

तरी राजेंद्रसिंग अजितसिंग यांच्याकडून सदरील काम अंदाजपत्रकीय दरापेक्षा 4.50% कमी दराने करून घेण्याबाबतचा प्रस्ताव विचारार्थ तथा मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे विजयचौक ते कालीकामाता मंदिर 50 फुट विकास योजना रस्त्याचे खडीकरण व डांबरीकरण करणे या कामासाठी प्राप्त झालेल्या निविदांपैकी तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी व अं.प. दरापेक्षा 4.50% कमी दराची राजेंद्रसिंग अजितसिंग यांची निविदा स्विकारणेस सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. 269 :**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, प्रभाग क्र.26 अंतर्गत गणेश, नुतन यशवंत, नवभारत या विविध स्वयंविकसीत गृहनिर्माण संस्थेतील रस्त्यांचे डांबरीकरण करणे या कामासाठी तयार करण्यात आलेल्या रक्कम रू.12,93,400/- च्या अंदाजपत्रकास स्थायी समितीची मंजुरी प्राप्त झाली आहे. सदर कामासाठी निविदापत्रके मागविली असता, 4 निविदापत्रके विक्री झाली. त्यापैकी निविदा स्विकृतीच्या अंतिम तारखेपर्यंत एकूण 4 निविदापत्रके प्राप्त झाली. त्याचा तुलनात्मक तपशील खालीलप्रमाणे आहे.

| | | |
|---|---|---|
| 1. | मंजुळा कन्स्ट्रक्शन | **17.61% कमी दराने** |
| 2. | आदीनाथ कन्स्ट्रक्शन | **16.91% कमी दराने** |
| 3. | राजेंद्रसिंग अजितसिंग | **15.30% कमी दराने** |
| 4. | मॉस्कॉट कन्स्ट्रक्शन | **15.00% कमी दराने** |

वरील प्राप्त निविदा पत्रकापैकी मंजुळा कन्स्ट्रक्शन यांचे दर तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी व अं.प.दरापेक्षा 17.61% ने कमी आहेत. यास मा.आयुक्त यांनी शिफारस करून प्रस्ताव स्थायी समिती सभेत सादर करण्याचे आदेशीत केलेले आहे.

तरी मंजुळा कन्स्ट्रक्शन यांच्याकडून सदरील काम अं.प.दरापेक्षा 17.61% कमी दराने करून घेण्याबाबतचा प्रस्ताव विचारार्थ तथा मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे प्रभाग क्र.26 अंतर्गत गणेश, नुतन यशवंत, नवभारत या विविध स्वयंविकसीत गृहनिर्माण संस्थेतील रस्त्यांचे डांबरीकरण करणे या कामासाठीप्राप्त झालेल्या निविदांपैकी तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा 17.61% कमी दराची मंजुळा कन्स्ट्रक्शन यांची निविदा स्विकारणेस सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. 270 :**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, प्रभाग क्र. 9 नंदनवन कॉलनी समोरील मुख्य रस्त्याचे डांबरीकरण करणे या कामासाठी तयार करण्यात आलेल्या रक्कम रू.14,98,700/- च्या अंदाजपत्रकास स्थायी समितीची मंजुरी प्राप्त झाली आहे. सदर कामासाठी निविदापत्रके मागविली असता, 5 निविदापत्रके विक्री झाली. त्यापैकी निविदा स्विकृतीच्या अंतिम तारखेपर्यंत एकूण 5 निविदापत्रके प्राप्त झाली. त्याचा तुलनात्मक तपशील खालीलप्रमाणे आहे.

| | | |
|---|---|---|
| 1. | के. बी. पाथ्रीकर | **17.21% कमी दराने** |
| 2. | मंजुळा कन्स्ट्रक्शन | **17.17% कमी दराने** |
| 3. | आदीनाथ कन्स्ट्रक्शन | **16.91% कमी दराने** |
| 4. | राजेंद्रसिंग अजितसिंग | **15.81% कमी दराने** |
| 5. | मॉस्कॉट कन्स्ट्रक्शन | **15.00% कमी दराने** |

वरील प्राप्त निविदा पत्रकापैकी के. बी. पाथ्रीकर यांचे दर तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी व अं.प.दरापेक्षा 17.21% ने कमी आहेत. यास मा.आयुक्त यांनी शिफारस करून प्रस्ताव स्थायी समिती सभेत सादर करण्याचे आदेशीत केलेले आहे.

तरी के. बी. पाथ्रीकर यांच्याकडून सदरील काम अं.प.दरापेक्षा 17.21% कमी दराने करून घेण्याबाबतचा प्रस्ताव विचारार्थ तथा मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे प्रभाग क्र. 9 नंदनवन कॉलनी समोरील मुख्य रस्त्याचे डांबरीकरण करणे या कामासाठी प्राप्त झालेल्या निविदांपैकी तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा 17.21% कमी दराची के.बी.पाथ्रीकर यांची निविदा स्विकारणेस सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. 271 :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, वॉर्ड क्र.64 झांबड इस्टेट मधील खुल्या जागेत इटालीयन डिझायनर पेव्हींग ब्लॉक बसविणे या कामाकरीता सा.बां.विभाग सन 2005-06 चे जिल्हा दरसुचीनुसार रक्कम रू.14,17,500/- चे अंदाजपत्रक तयार करण्यात आले असून त्यास स्थायी समिती ठराव क्र.126 दि.4.9.2007 अन्वये मान्यता मिळालेली आहे.

त्यानुसार उपरोक्त कामास्तव निविदा मागविण्यात आल्या असता एकुण 5 निविदा विक्री झाल्या व 5 निविदा दर भरून प्राप्त झाल्या. त्याचा तुलनात्मक तक्ता खालील प्रमाणे.

| | | |
|---|---|---|
| 1. | टेंभुर्णीकर प्रल्हाद सुरेश | 30.30% कमी दराने |
| 2. | राणा कन्स्ट्रक्शन | 22.34% कमी दराने |
| 3. | उदय इंजिनिअरींग वर्क्स | 19.19% कमी दराने |
| 4. | एल.के. कन्स्ट्रक्शन | 10.23% कमी दराने |
| 5. | आदीनाथ कन्स्ट्रक्शन | 8.33% जास्त दराने |

तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी दराची निविदा म्हणजेच अं.प.दरापेक्षा 30.30% कमी दराची निविदा टेंभुर्णीकर प्रल्हाद सुरेश यांची प्राप्त झालेली आहे. सदरील निविदा स्थायी समिती समोर सादर करणेस्तव मा.आयुक्त यांनी शिफारस केलेली आहे.

त्यानुसार टेंभुर्णीकर प्रल्हाद सुरेश यांची अं.प.दरापेक्षा 30.30% कमी दराची निविदा प्रस्ताव मान्यतेस्तव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे वॉर्ड क्र.64 झांबड इस्टेट मधील खुल्या जागेत इटालीयन डिझायनर पेव्हींग ब्लॉक बसविणे या कामाकरीता प्राप्त झालेल्या निविदांपैकी तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा 30.30% कमी दराची टेंभुर्णीकर प्रल्हाद सुरेश यांची निविदा स्विकारणेस सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. 272 :**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, प्रभाग क्र. 18 पवननगर येथील विविध रत्याचे कॉंक्रीटीकरण करणे या कामासाठी तयार करण्यात आलेल्या रक्कम रू.16,31,600/- च्या अंदाजपत्रकास स्थायी समितीची मंजुरी प्राप्त झाली आहे. सदर कामासाठी निविदापत्रके मागविली असता, 1 निविदापत्रक विक्री झाले. व निविदा स्विकृतीच्या अंतिम तारखेपर्यंत एकूण 1 दरपत्रक प्राप्त झाले. त्याचा तपशील खालीलप्रमाणे आहे.

| | | |
|---|---|---|
| 1. | आर. के. कन्स्ट्रक्शन | **9.99% कमी दराने** |

वरील प्राप्त निविदा पत्रकापैकी आर. के. कन्स्ट्रक्शन यांचे दर तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी व अं.प.दरापेक्षा 9.99% ने कमी आहेत. यास मा.आयुक्त यांनी शिफारस करून प्रस्ताव स्थायी समिती सभेत सादर करण्याचे आदेशीत केलेले आहे.

तरी आर. के. कन्स्ट्रक्शन यांच्याकडून सदरील काम अं.प.दरापेक्षा 9.99% कमी दराने करून घेण्याबाबतचा प्रस्ताव विचारार्थ तथा मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे प्रभाग क्र. 18 पवननगर येथील विविध रत्याचे कॉंक्रीटीकरण करणे या कामासाठी प्राप्त झालेली आर.के. कन्स्ट्रक्शन यांची अंदाजपत्रकीय दरापेक्षा 9.99% कमी दराची निविदा स्विकारणेस सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. 273 :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, महानगरपालिका मुख्य प्रशासकीय इमारत टप्पा क्र.1, 2, 3 येथे विविध कामे करण्यास्तव मा.पदाधिकारी, अधिकारी यांच्याकडून सूचना करण्यात येत असतात. प्रशासकीय इमारत येथे विविध आवश्यक कामे वर्षभराच्या कालावधीमध्ये करण्याच्या दृष्टीकोनातून आवश्यक बाबी व परिमाण गृहीत धरून सा.बां.विभाग सन 2006-07 च्या जिल्हा दरसुची नुसार रक्कम रू.13.50 लक्ष चे अंदाजपत्रक तयार करण्यात आले असून त्यास स्थायी समिती ठराव क्र.113 दि.4.9.2007 अन्वये मान्यता दिलेली आहे.

त्यानुसार उपरोक्त कामास्तव निविदा मागविण्यात आल्या असता एकुण 3 निविदा विक्री झाल्या व 3 निविदा दर भरून प्राप्त झाल्या. त्याचा तुलनात्मक तक्ता खालीलप्रमाणे.

| | | |
|---|---|---|
| 1. | इरम कन्स्ट्रक्शन कंपनी | 16.78% कमी दराने |
| 2. | काझी मुबारीजउद्यीन बशीर उद्यीन | 13.59% कमी दराने |
| 3. | तुषार कन्स्ट्रक्शन | अंदाजपत्रकीय दराने |

तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी दराची निविदा म्हणजेच अं.प.दरापेक्षा 16.78% कमी दराची निविदा इरम कन्स्ट्रक्शन कंपनी यांची प्राप्त झालेली आहे. सदरील निविदा स्थायी समिती समोर सादर करणेस्तव मा.आयुक्त यांनी शिफारस केलेली आहे.

त्यानुसार इरम कन्स्ट्रक्शन कंपनी यांची अं.प.दरापेक्षा 16.78% कमी दराची निविदा प्रस्ताव मान्यतेस्तव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे महानगरपालिका मुख्य प्रशासकीय इमारत टप्पा क्र.1, 2, 3 येथे विविध आवश्यक कामे वर्षभराच्या कालावधीमध्ये करण्यासाठी प्राप्त झालेल्या निविदांपैकी तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा 16.78% कमी दराची मे. इरम कन्स्ट्रक्शन यांची निविदा स्विकारणेस सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. 274 :**

कार्यकारी अभियंता (ज.नि., वि., इ. व उ.) यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, वॉर्ड क्र.19 मध्ये सेक्टर निहाय पोलसह उर्जा बचत पथदिवे लावणे या कामाचे अंदाजपत्रक रक्कम रू.13,98,720/- चे तयार करण्यात आले आहे. सदर कामाचा खर्च सन 2007-08 अर्थसंकल्पात पृष्ठ क्र.195 वरील

अ.क्र.20 वर रक्कम रू.8.00 लक्ष, पृष्ठ क्र.डब्ल्यू 225 वरील अ.क्र. वर रू.5.00 लक्ष तसेच सन 2007-08 मध्ये स्पील झालेल्या कामातून रक्कम रू.1.00 लक्ष इ. सर्वसाधारण सभेच्या मंजुरीने एकत्रित वळती तरतुदीतून करण्यात येणार आहे.

सदर कामाकरीता ई-निविदा विभागातर्फे निविदा मागविण्यात आल्या असता, निविदा दाखल करण्याच्या तारखेपर्यंत चार निविदा विक्री झाल्या असून, चार दर भरलेल्या निविदा दाखल झाल्या. प्राप्त निविदेचा तुलनात्मक तपशील खालील प्रमाणे.

| | | |
|---|---|---|
| 1. | शांती इलेक्ट्रीकल्स | **40.12% कमी दराने** |
| 2. | बानेश्वर इलेक्ट्रीकल्स | **37.73% कमी दराने** |
| 3. | मे. ओसामा इलेक्ट्रीकल्स | **33.00% कमी दराने** |
| 4. | मे. आकाश इलेक्ट्रीकल्स | **28.00% कमी दराने** |

तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी म्हणजेच अंदाजपत्रकीय दरापेक्षा 40.12% कमी दराची निविदा मे.शांती इलेक्ट्रीकल्स यांनी दाखल केलेली आहे. करीता सर्वात कमी दराची निविदा मान्यतेसाठी स्थायी समितीपुढे ठेवणेकरीता मा.आयुक्त यांनी शिफारस केलेली आहे.

त्यानुसार शांती इलेक्ट्रीकल्स यांची अंदाजपत्रकीय दरापेक्षा 40.12% कमी दराची निविदा स्विकारणेसाठी प्रस्ताव विचारार्थ तथा मान्यतेस्तव सादर.

**<u>संवाद :</u>**

डॉ.आशा बिनवडे : 40 टक्के कमी दराने काम करणार आहे, चांगल्या प्रतिचे काम होईल का शंका येतो.

श्री.संजय शिरसाट : जास्त कमी दराने ठेकेदार कामे घेतात, वर्क ऑर्डर घेतांना जी 2 टक्के रक्कम भरणा करायची ती ठेकेदार लवकर भरणा करीत नाही. त्यासाठी कमीत कमी 8 ते 10 दिवसाचा कालावधी द्यावा जेणे करून काम लवकर सुरू होईल. ज्यांनी वर्क ऑर्डर देवूनही काम वेळेवर सुरू केले नाही त्यांचा काळया यादीत समावेश करावा. मुदतीत काम केले नाही तर रितसर कार्यवाही करावी.

मा.सभापती : कोणत्याही ठेकेदाराचे 2 टक्के रक्कम भरणा करण्याचे लेटर घेतल्यानंतर जी मुदत दिलेली असते त्या मुदतीच्या आत काम सुरू करावे.2 टक्के रक्कम भरण्याची मुदत 15 दिवसाच्या वर नसावी. मुदतीत काम केले नाही अशा ठेकेदारावर रितसर कार्यवाही करावी.

श्री.मधुकर सावंत : 2 टक्के रक्कम केंव्हा भरावी, वर्क ऑर्डर केव्हा द्यावी सदर काम केंव्हा सुरू केले पाहिजे सिस्टीमचा खुलासा करावा. माझे वार्डात सिधी कॉलनी येथे पेव्हर ब्लॉकचे 27 टक्के कमी दराने काम दिले आहे. 3 महिने झाले अद्याप काम सुरू झालेले नाही. रमानगर स्मशानभुमीचे 5.50 लक्षचे काम 33 टक्के कमी दराने दिले. अजुनही काम सुरू नाही. ठेकेदाराशी संपर्क साधला असता फोन उचलत नाही, तीन ते चार महिने झाले टाईम लिमीट ठेवावे. जे काम करण्यास तयार नसतील त्यांचा काळया यादीत समावेश करावा.

अति.शहर अभियंता : निविदा काढतांना 90 दिवसात निविदा अंतिम करण्याचा कालावधी राहिल अशी अट टाकली जाते.या कालावधीत वर्क ऑर्डर देवून त्यांनी काम सुरू करणे बंधनकारक असते.2 टक्के रक्कम भरणा करण्याचे लेटर दिल्यानंतर सात दिवसाच्या आत भरणा केले नाही तर आणखी सात दिवसाची मुदत दिली जाते त्या मुदतीत भरणा केली नाही तर अनामत रक्कम जप्त करून त्यांना काळया यादीत समावेश करता येते.

श्री.मधुकर सावंत : मुदतीत ज्या ठेकेदाराची रक्कम भरणा केली नाही तर त्यांचेवर कार्यवाही करावी त्यांना काळया यादीत समावेश करावे.

श्री.हिम्मतराव दाभाडे : उस्मानपूरा पोलीस स्टेशनच्या बाजूला गटार दुरूस्तीचे काम गेल्या सहा महिण्यापासून दिलेले असतांना अदयाप सुरू झालेले नाही.नुसते खोदकाम केलेले आहे.

अति.शहर अभियंता : सदर जागेवर काम सुरू करण्यात आले होते काही नागरीकांनी येवून काम बंद केले. ब्रिज वाढविण्याचे कामाचे टेंडर अंतिम झालेले आहे. ब्रीज मोठा झाल्यास गटारीची आवश्यकता भासणार नाही असे वाटते. खर्च होवून उपयोग होणार नाही म्हणून काम थांबविले आहे.

श्री.हिम्मतराव दाभाडे : उस्मानपूरा भागात जनावरांची कत्तल होते रक्तमिश्रीत पाणी वाहात जाते समोर लोकांनी ते अडवले. ऑलरेडी तेथे गटार आहे गटार क्रॉस करून स्लम भागात पाणी काढून देण्याचा प्रयत्न होत आहे. असा भेदभाव कशासाठी होत आहे. सहा महिणे काम होत नसेल तर योग्य नाही नवीन बजेटमधील एकही काम माझे वार्डात चालू झालेले नाही.

श्री.अ.रशीद खान : काम करण्याच्या कार्यवाहीसाठी 90 दिवसाची मुदत दिली जाते. आज काही टेंडर काढले जात आहेत. ही कामे स्पीलओव्हरमध्ये जातील,आजपर्यत किती टेंडर काढलेले आहे किती कामे या वर्षात होणार आहे. तातडीने कामे होत नसतील तर मा.आयुक्त तसेच सर्व अधिकारी यांची संयुक्त बैठक आपण आयोजित करावी, कामे सुरू करावी.

मा.सभापती : अतिक्रमण तसेच विकास कामाचे अंदाजपत्रका संदर्भात तीन दिवसाच्या आत अधिकारी यांचे समवेत बैठक आयोजित करून योग्य तो निर्णय घेतला जाईल. या विषयास मंजुरी देण्यात येते.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे वॉर्ड क्र.19 मध्ये सेक्टर निहाय पोलसह उर्जा बचत पथदिवे लावणे या कामासाठी प्राप्त झालेल्या निविदांपैकी तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा 40.12% कमी दराची शांती इलेक्ट्रीकल्स यांची निविदा स्विकारणेस सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी

**विषय क्र. 275 :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, कोकणवाडी चौकातील सध्या अस्तित्वात असलेला पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकर यांचा पुतळा बदलून त्या जागी अधिक उंचीचा (12 फुट) पुतळा बसविण्यासाठी सर्वसाधारण सभेने रू.12.50 लक्ष एवढी तरतूद उपलब्ध करून दिली आहे. त्या आधारे पुतळा व त्यासाठी आवश्यक चौथरा यासाठी दरपत्रके (Offers) मागविण्यात आल्या होत्या. त्यानुसार खालील प्रमाणे दर प्राप्त झाले.

1. सुरूची आर्टस् (श्री.उत्तम पाचारणे) रू.16,00,000/-
2. श्री. सुनिल के. देवरे रू.17,50,000/-

यात सर्वात कमी दर श्री.उत्तम पाचारणे यांचे सुरूची आर्टस् रू.16,00,000/-(सोळा लक्ष रूपये) एवढे होते. मा. आयुक्तांनी संबंधीतास वाटाघाटीस बोलावले असता त्यांनी हे काम रू.14,50,000/- एवढया किंमतीत करून देण्यास तयारी दर्शविली आहे. तशी लेखी संमतीही दिली आहे. सदर कामांतर्गत पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकर यांचा 12 फुट उंचीचा पुतळा पुरविणे व बसविणे तसेच या पुतळ्यासाठी सुयोग्य असा चौथरा तयार करणेचा समावेश आहे.

तरी सदर कामासाठी रू.2,00,000/- (रू. दोन लक्ष) चा अतिरिक्त खर्च मंजूर करणे, रू.14,50,000/- चे खर्चास मान्यता देणे व सुरूची आर्टस् (श्री.उत्तम पाचारणे) यांचे दरपत्रक मान्य करणेचा प्रस्ताव विचारार्थ सादर.

मा. सभापती : प्रस्ताव क्र.275 ते 289 मंजूर करण्यात येतात.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे कोकणवाडी चौकातील सध्या अस्तित्वात असलेला पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकर यांचा पुतळा बदलून त्या जागी अधिक उंचीचा (12 फुट) पुतळा बसविण्याकरीता पुतळा पुरविणे व बसविणे तसेच या पुतळ्यासाठी सुयोग्य असा चौथरा तयार करणे या कामाकरीता प्राप्त दरपत्रकापैकी, सदर कामासाठी रू.2,00,000/-(रू.दोन लक्ष)च्या अतिरिक्त खर्चासह रू.14,50,000/- चे खर्चास व वाटाघाटी अंती ठरल्यानुसार सुरूची आर्टस् (श्री.उत्तम पाचारणे) यांचे रू.14,50,000/- एवढया किंमतीचे दरपत्रक स्विाकरणेस सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

ऐ न वे ळ चे  वि ष य

**विषय क्र. 276 :**

कार्यकारी अभियंता (विद्रेइवउ) प्रस्ताव सादर करीत आहेत की, प्रतापनगर स्मशानभूमी विकसीत करणे या कामाचे अंदाजपत्रक सा.बां. खात्याच्या सन 2006-07 च्या दरसुचीनुसार तयार करण्यात आले असून त्यानुर कामाची अंदाजपत्रकीय रक्कम रू.14,98,500/- इतकी आहे. सदरील अंदाजपत्रकास मा.आयुक्त यांची प्रशासकीय मान्यता झाली असून कामाचा खर्च स्मशानुभूमी विकास या लेखाशिर्षाखाली पृष्ठ क्र.डब्ल्यु.161 अ.क्र.5 वर रू.15.00 लक्ष उपलब्ध तरतुदीमधून प्रस्तावित आहे.

सदरील काम प्रतापनगर स्मशानभूमी विकसीत करणे या कामाचा समावेश आहे. करीता अंदाजपत्रक मंजुरीबाबतचा प्रस्ताव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दश्र्ाविल्याप्रमाणे प्रतापनगर स्मशानभूमी विकसीत करणे या कामासाठी तयार करण्यात आलेल्या रक्कम रू.14,98,500/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. 277 :**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केलेला आहे की, प्रभाग क्र.72 अंतर्गत मुख्य रस्त्याचे पुनःडांबरीकरण करणे या कामासाठी तयार करण्यात आलेल्या रक्कम रू.40,99,082/- च्या अंदाजपत्रकास सर्वसाधारण सभेची मंजुरी प्राप्त झाली आहे. एकूण 5 निविदापत्रके विकली गेली व निविदा स्विकृतीच्या अंतिम तारखेपर्यंत 5 निविदापत्रके दर भरून प्राप्त झाली. प्राप्त निविदापत्रके उघडण्यात आली असता खालील प्रमाणे दर प्राप्त झाले आहेत.

| | | |
|---|---|---|
| 1. | रे कन्स्ट्रक्शन | 4.75 % जास्त दराने |
| 2. | राजेंद्रसिंग अजितसिंग | 17.21% जास्त दराने |
| 3. | मॉस्कॉट कन्स्ट्रक्शन | 17.49% जास्त दराने |
| 4. | आदीनाथ कन्स्ट्रक्शन | 18.51% जास्त दराने |
| 5. | ए. एस. कन्स्ट्रक्शन | 20.20% जास्त दराने |

वरील प्राप्त निविदा पत्रकापैकी रे कन्स्ट्रक्शन यांचे दर तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा 4.75% ने जास्त आहेत. यास मा.आयुक्त यांनी शिफारस करून प्रस्ताव स्थायी समिती सभेत सादर करण्याचे आदेशीत केलेले आहे.

तरी रे कन्स्ट्रक्शन यांच्याकडून सदरील काम अंदाजपत्रकीय दरापेक्षा 4.75% जास्त दराने करून घेण्याबाबतचा प्रस्ताव विचारार्थ तथा मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे प्रभाग क्र.72 अंतर्गत मुख्य रस्त्याचे पुनःडांबरीकरण करणे या कामासाठी प्राप्त झालेल्या निविदापैकी तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा 4.75% जास्त दराची **रे कन्स्ट्रक्शन** यांची निविदा स्विकारणेस सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. 278 :**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केलेला आहे की, शहरातील विविध रस्त्यांवर, चौकात साईन बोर्ड, झेब्रा क्रॉसींग व लेन मार्कींग करणे या कामाची अंदाजपत्रकीय रक्कम रू.17,73,300/- असून निविदा विक्रीच्या अंतिम तारखेपर्यंत एकूण 3 निविदापत्रके विकली गेली व निविदा स्विकृतीच्या अंतिम तारखेपर्यंत यापैकी 2 निविदापत्रके दर भरून प्राप्त झाली. त्याचे दर खालील प्रमाणे आहेत.

| | | |
|---|---|---|
| 1. | संदीप संतोषराव पाटील | 1.25%कमी दराने |
| 2. | संतोष चव्हाण | 6.22% जास्त दराने |

वरील प्राप्त निविदा पत्रकापैकी संदीप संतोषराव पाटील यांचे दर तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी व अं.प. दरापेक्षा 1.25% ने कमी आहेत. यास मा.आयुक्त यांनी शिफारस करून प्रस्ताव स्थायी समिती सभेत सादर करण्याचे आदेशीत केलेले आहे.

तरी संदीप संतोषराव पाटील यांच्याकडून सदरील काम अं.प.दरापेक्षा 1.25% कमी दराने करून घेण्याबाबतचा प्रस्ताव विचारार्थ तथा मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे शहरातील विविध रस्त्यांवर, चौकात साईन बोर्ड, झेब्रा क्रॉसींग व लेन मार्कींग करणे या कामासाठी प्राप्त झालेल्या निविदांपैकी तुलनात्मकदृष्ट्या कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा 1.25% कमी दराची संदीप संतोषराव पाटील यांची निविदा स्विकारणेस सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. 279 :**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केलेला आहे की, प्रभाग क्र.49 गुलमोहर कॉलनी अंतर्गत रस्त्याचे डांबरीकरण करणे या कामासाठी तयार करण्यात आलेल्या रक्कम रू.9,95,650/- च्या अंदाजपत्रकास सर्वसाधारण सभेची मंजुरी प्राप्त झाली आहे. एकूा 6 निविदापत्रके विकली गेली व निविदा स्विकृतीच्या अंतिम तारखेपर्यंत यापैकी एक निविदापत्रक दर भरून प्राप्त झाले. प्राप्त निविदापत्रक उघडण्यात आले असता खालील प्रमाणे दर प्राप्त झाले होते.

1. ए. सी. कोठारी 7.99% जास्त दराने

वरील प्राप्त निविदापत्रक ए. सी. कोठारी यांचे असून अंदाजपत्रकीय दरापेक्षा 7.99% ने जास्त आहे. यास मा.आयुक्त यांनी शिफारस केल्यानुसार प्रस्ताव स्थायी समिती समिती सभा दि.7.8.2007 च्या सभेत विषय क्र.86 अन्वये मंजुरी प्राप्त झाली होती. परंतु सदरील गुत्तेदार श्री. ए.सी.कोठारी यांनी सदर कामाची 2% अनामत रक्कम व करारनामा मुदतीच्या आत सादर न केल्यामुळे व संबंधीत प्रभागाचे स.नगरसेवक यांनी सदरील कामासाठी केलेल्या पाठपुराव्या नुसार संबंधीत कामाचे **गुत्तेदार श्री. ए. सी. कोठारी यांच्या नांवाचा समावेश काळया यादीत करून** रिस्क अँड कॉस्टच्या धर्तीवर दुसऱ्या हॉटमिक्स प्लँटधारक श्री.चंद्रम्मा आशन्ना यांचेमार्फत सदरील काम पुर्वीच्या मंजूर दरात करून घेण्याच्या प्रस्तावास शिफारस करून प्रस्ताव स्थायी समिती सभेत सादर करण्याचे आदेशीत केलेले आहे.

तरी श्री. चंद्रम्मा आशन्ना यांच्याकडून सदरील काम रिस्क अँड कॉस्टच्या धर्तीवर अंदाजपत्रकीय दरापेक्षा 7.99% जास्त दराने करून घेण्याबाबतचा प्रस्ताव विचारार्थ तथा मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे , प्रभाग क्र.49 गुलमोहर कॉलनी अंतर्गत रस्त्याचे डांबरीकरण करणे या कामासाठी प्राप्त कमी दराचे निविदाधारक गुत्तेदार श्री. ए.सी.कोठारी यांनी सदर कामाची 2% अनामत रक्कम व करारनामा मुदतीच्या आत सादर न केल्यामुळे गुत्तेदार श्री. ए.सी.कोठारी यांच्या **नांवाचा समावेश काळया यादीत करून** रिस्क अँड कॉस्टच्या धर्तीवर दुसऱ्या हॉटमिक्स प्लँटधारक श्री.चंद्रम्मा आशन्ना यांचेमार्फत सदरील काम पुर्वीच्या मंजूर दरात म्हणजेच अंदाजपत्रकीय दरापेक्षा 7.99% जास्त दराने करून घेण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. 280 :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, वॉर्ड क्र.51 इंदिरानगर स्लम गल्ली नं.29 ते 33 इंदिरा प्राथमिक शाळेसमोर रस्त्यालगत प्रिकास्ट आरसीसी 450 मीमी अर्धगोलाकार सरफेस गटार बांधणे व त्यावर प्रिकास्ट चौकोनी ढापे बसविणे या कामाचे अंदाजपत्रक म.जी.प्रा./सा.बां.खात्याच्या सन 2006-07 च्या दरसुचीनुसार तयार करण्यात आले असून रक्कम रू.12,93,000/- च्या अंदाजपत्रकास मा.स्थायी समिती ठराव क्र.164 दि.23/10/2007 अन्वये मान्यता प्राप्त झालेली असून सदर कामाच्या निविदा मागविण्यात आल्या असता निविदा विक्रीच्या अंतिम तारखेपर्यंत एक निविदा विक्री झाली व स्विकृतीच्या अंतिम तारखेपर्यंत एक निविदा दर भरून प्राप्त झाली असल्याचा अहवाल ई-टेंडरींग विभागाकडून प्राप्त आहे. त्याचा तपशील खालील प्रमाणे आहे.

| | | |
|---|---|---|
| 1. | श्री.एकनाथ माणिकराव दहिफळे | 7.50% कमी दराने |

अंदाजपत्रकीय दरापेक्षा 7.50% कमी दराची निविदा श्री.एकनाथ माणिकराव दहिफळे यांची आहे. मा. आयुक्त यांनी त्यास मान्यता दिली आहे. तरी श्री.एकनाथ माणिकराव दहिफळे यांची अंदाजपत्रकीय दरापेक्षा 7.50% कमी दराची निविदा विचारार्थ तथा मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे वॉर्ड क्र.51 इंदिरानगर स्लम गल्ली नं.29 ते 33 इंदिरा प्राथमिक शाळेसमोर रस्त्यालगत प्रिकास्ट आरसीसी 450 मीमी अर्धगोलाकार सरफेस गटार बांधणे व त्यावर प्रिकास्ट चौकोनी ढापे बसविणे या कामासाठी प्राप्त झालेली अंदाजपत्रकीय दरापेक्षा 7.50% कमी दराची श्री.एकनाथ माणिकराव दहिफळे यांची निविदा स्विकारणेस सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. 281 :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, वॉर्ड क्र.97 बनेवाडी प्रभागातून वाहणाऱ्या खामनदी लगत संरक्षित भिंत बांधणेसाठी सर्वसाधारण सभा विषय क्र.683 दि.11/1/2007 अन्वये बाराव्या वित्त आयोगाकडून प्राप्त झालेल्या रक्कमेतून 50.00 लक्ष तरतूद उपलब्ध करण्यात आली. त्यानुसार रक्कम रू.49,97,500/- चे अंदाजपत्रक म.जी.प्रा./सा.बां. खात्याच्या सन 2006-07 च्या दरसूचीनुसार तयार करण्यात आले आहे. त्यास मा.आयुक्त यांची दि.21.8.2007 रोजी मंजुरी प्राप्त आहे. सदर कामाच्या निविदा मागविण्यात आल्या असता निविदा विक्रीच्या अंतिम तारखेपर्यंत 5 निविदा विक्री झाल्या व स्विकृतीच्या अंतिम तारखेपर्यंत 5 निविदा दर भरून प्राप्त झाल्या असल्याचा अहवाल इ-टेंडरींग विभागाकडून प्राप्त आहे. त्याचा तपशील खालील प्रमाणे आहे.

| | | |
|---|---|---|
| 1. | मे. एल. के. कन्स्ट्रक्शन | 12.86% कमी दराने |
| 2. | मे. तुषार कन्स्ट्रक्शन | 11.90% कमी दराने |
| 3. | उदय इंजिनिअरींग वर्क्स | 11% कमी दराने |
| 4. | मे. इरम कन्स्ट्रक्शन कंपनी | 10.50% कमी दराने |
| 5. | अमन असोसिएट्स | 0.79% कमी दराने |

तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी म्हणजे अं.प.दरापेक्षा 12.86% कमी दराची निविदा मे.एल.के. कन्स्ट्रक्शन यांची आहे. मा.आयुक्त यांची त्यास मान्यता झाली आहे. तरी मे.एल.के.कन्स्ट्रक्शन यांची अं.प.दरापेक्षा 12.86% कमी दराची निविदा मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे वॉर्ड क्र.97 बनेवाडी प्रभागातून वाहणाऱ्या खामनदी लगत संरक्षित भिंत बांधणेसाठी प्राप्त झालेल्या निविदांपैकी तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा 12.86% कमी दराची मे. एल. के. कन्स्ट्रक्शन यांची निविदा स्विकारणेस सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. 282 :**

अतिरिक्त शहर अभियंता, महानगरपालिका औरंगाबाद यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, जलनि:सारण संबंधीची विविध प्रकारची कामे करण्यासाठी मनपाकडे सध्या दोन जेटींग मशीन व दोन

व्हॅक्युम एम्टीअर आहेत. महानगरपालिकेकडे सिडकोचे हस्तांतरण झाल्यामुळे उपलब्ध मशिन्स अपुऱ्या पडत आहेत. त्यामुळे एक जेटींग/व्हॅक्युम मशिन खरेदी करणे आवश्यक आहे.

ड्रेनेजची कामे करण्यासाठी नवीन वेगवेगळ्या प्रकारच्या मशिन्स बाजारात आलेल्या आहेत. पैकी नियमित वापरास सुलभ असणारी Tata-912 LPT चेसीसवर उभारणी करण्यात येणारे 4 KL क्षमतेचे जेटींग व्हॅक्युम कंबाईन युनिट खरेदी करण्याचे प्रस्तावित आहे.

| | | |
|---|---|---|
| 1. | Tata-912 LPT-Ex/38 Cab with PTO Chassis | **7,31,485.00** |
| 2. | Jetting/Vaccume combination unit 4 LCH special purpose vahicle mounted machine. | **21,81,409.00** |
| | Total: | **29,12,894.00** |

सदरील खरेदी ही बाराव्या वित्त आयोगाकडून प्राप्त निधीतून प्रस्तावित करण्यात आली असुन अंदाजपत्रकास प्रशासकीय मान्यता मिळालेली आहे.

प्रशासकीय मान्यतेनंतर जेटींग, व्हॅक्युम कंबाईन युनिट खरेदी करण्यासाठी जाहीर निविदा मागविण्यात आल्या होत्या. निविदा सुचना जा.क्र.मनपा/अशअ/यांत्रिकी/329/07 दिनांक 5.10.2007 अन्वये दै.लोकमत, दै.नवा मराठा, दै.औरंगाबाद टाईम्स इ. वर्तमानपत्रात व मनपाच्या वेबसाईटवर प्रसिध्द करण्यात आली. त्यानुसार तीन निविदा विक्री व तीन निविदा प्राप्त झाल्या असून सर्वात कमी दराची निविदा **M/s. KAM AVIDA ENVIRO ENGINEERS PVT. LTD. PUNE** यांची असुन, ती रूपये 20,96,695/- (1% कमी दराची) खर्चाची आहे.

Tata-912 LPT-Ex/38 Cab with PTO Chassis ह्या टाटा चासीससाठी टाटा कंपनीचे अधिकृत विक्रेते मे. वासन ॲटोमोटीव्ह प्रा.लि. वाळुज, औरंगाबाद ह्यांचे दरपत्रक प्राप्त झाले असुन जकात सोडून दर रूपये 7,47,257/- असे आहेत. 'N' form भरून जकातीमध्ये सुट घेण्यात येईल.

अशा प्रकारे चासीस खरेदी करून त्यावर जेटींग, व्हॅक्युम कंबाईन युनिटची उभारणी करण्यासाठी एकुण रूपये 28,43,952/- खर्च येणार आहे.

जेटींग/व्हॅक्युम कंबाईन युनिटद्वारे सेप्टीक टँक/चेंबर मधील पाणी उपसा करणे तसेच ड्रेनेज लाईन चोकअप काढण्याची कामे एकाच मशिनद्वारे करता येतात. दोन वेगवेगळे युनिट घेवुन दुप्पट खर्च करण्यापेक्षा ह्या प्रकारचे कंबाईन युनिट आर्थिकदृष्ट्या फायदेशीर आहे.

करीता वरील प्रमाणे एक जेटींग/व्हॅक्युम कंबाईन युनिट Tata-912 LPT- चेसीसवर बसवुन खरेदी करण्यासाठी येणाऱ्या रूपये 28,43,952/- खर्चास मंजुरी मिळावी. टाटा चेसीस मे. वासन ॲटोमोटीव्ह प्रा.लि. वाळूज, औरंगाबाद यांचेकडून रूपये 7,47,257/- मध्ये खरेदी करण्यास मंजुरी मिळावी.

तसेच जेटींग/व्हॅक्युम कंबाईन युनिटसाठी आलेली **M/s. KAM AVIDA ENVIRO ENGINEERS PVT. LTD. PUNE** यांची 1% कमी दराची रूपये 20,96,695/- ची निविदा मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे ड्रेनेजची कामे करण्यासाठी नियमित वापरास सुलभ असणारी Tata-912 LPT चेसीसवर उभारणी करण्यात येणारे, 4 KL क्षमतेचे जेटींग व्हॅक्युम कंबाईन युनिट खरेदी करण्यासाठी प्राप्त निविदांपैकी तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी दराची **M/s. KAM AVIDA ENVIRO ENGINEERS PVT. LTD. PUNE** यांची रूपये 20,96,695/- (1% कमी दराची) खर्चाची निविदा स्विकारणेस तसेच Tata-912 LPT-Ex/38 Cab with PTO Chassis ह्या टाटा चासीससाठी टाटा कंपनीचे अधिकृत विक्रेते मे. वासन ॲटोमोटीव्ह प्रा.लि. वाळुज, औरंगाबाद ह्यांचे प्राप्त दरपत्रकानुसार जकात सोडून दर रूपये 7,47,257/- चे दरपत्रक स्विकारणेस आणि जेटींग/व्हॅक्युम

कंबाईन युनिट Tata-912 LPT- चेसीसवर बसवुन खरेदी करण्यासाठी येणाऱ्या रूपये 28,43,952/- खर्चास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. 283 :**

कार्यकारी अभियंता (ज.नि.,वि.,ड्रे.,इ. व उ.) यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, सिडको एन-1 ते एन-5 टाऊन सेंटर व शिवाजीनगर मधील पथदिव्यांची कॉम्प्रेहेन्सीव पध्दतीने वार्षिक देखभाल दुरूस्ती करण्याचे अंदाजपत्रक रक्कम रू.29,74,000/- चे तयार करून त्यास सर्वसाधारण सभा ठराव क्र. 920 दि.18/7/2007 अन्वये मान्यता मिळाली आहे.

सदर कामाकरीता कार्यालयीन निविदा सुचना जा.क्र. मनपा/ई-निविदा/135/07, दि.21/11/2007 अन्वये प्रसिध्दीस दिली असता निविदा विक्रीच्या अंतिम दिवशी सात निविदांची विक्री झाली व निविदा स्विकृतीच्या अंतिम दिवशी चार निविदा दर भरून प्राप्त झाल्या. त्या दिनांक 4/12/2007 रोजी उपस्थित गुत्तेदारांसमक्ष उघडण्यात आल्या. त्याचा तुलनात्मक तपशील पुढील प्रमाणे.

| | | |
|---|---|---|
| 1. | मे. अल्सन इलेक्ट्रीकल्स | 21.53% कमी दराने |
| 2. | मे. आकाश इलेक्ट्रीकल्स | 15.00% कमी दराने |
| 3. | मे.बानेश्वर इलेक्ट्रीकल्स अँड इलेक्ट्रॉनीक औद्योगिक सहकारी संस्था लि. | 13.31 % कमी दराने |
| 4. | मे. युनायटेड एजन्सीज | 5.55 % कमी दराने |

तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी म्हणजेच अंदाजपत्रकीय दरापेक्षा 21.53% कमी दराची मे.अल्सन इलेक्ट्रीकल्स यांची निविदा आहे. करीता मे.अल्सन इलेक्ट्रीकल्स यांची अं.प. दरापेक्षा 21.53% कमी दराची निविदा स्विकारणेस्तव प्रस्ताव मान्यतेस्तव तथा विचारार्थ सादर.

मा. सभापती : कंत्राटदाराच्या कामाचा आढावा घेवुन समाधानकारकपणे काम करीत नसल्यास त्यांचे देखभाल दुरूस्तीचे काम उपलब्ध गुत्तेदारांकडून मान्य दराने करून घेण्यासही अनुमती देण्यात येते.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, सिडको एन-1 ते एन-5 टाऊन सेंटर व शिवाजीनगर मधील पथदिव्यांची कॉम्प्रेहेन्सीव पध्दतीने वार्षिक देखभाल दुरूस्ती करण्याचे कामासाठी प्राप्त झालेल्या निविदांपैकी तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा **21.53%** कमी दराची **मे.अल्सन इलेक्ट्रीकल्स** यांची निविदा स्विकारणेस सर्वानुमते स्विकृतीसह मंजुरी देण्यात येते. कंत्राटदाराच्या कामाचा आढावा घेवुन समाधानकारकपणे काम करीत नसल्यास त्यांचे देखभाल दुरूस्तीचे काम उपलब्ध गुत्तेदारांकडून मान्य दराने करून घेण्यासही अनुमती देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. 284 :**

कार्यकारी अभियंता (ज.नि.,वि.,ड्रे.,इ. व उ.) यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, प्रभाग-ब मधील एन-6, एन-7, एन-8, एन-9, एन-11, एन-12 व एन-13 मधील पथदिव्यांची कॉम्प्रेहेन्सीव पध्दतीने वार्षिक देखभाल दुरूस्ती करण्याचे अंदाजपत्रक रक्कम रू.29,94,350/- चे तयार करून त्यास सर्वसाधारण सभा ठराव क्र. 919 दि.18/7/2007 अन्वये मान्यता मिळाली आहे.

सदर कामाकरीता कार्यालयीन निविदा सुचना जा.क्र.मनपा/ई-निविदा/135/07, दि.21/11/2007 अन्वये प्रसिध्दीस दिली असता निविदा विक्रीच्या अंतिम दिवशी सात निविदांची विक्री झाली व निविदा स्विकृतीच्या अंतिम दिवशी चार निविदा दर भरून प्राप्त झाल्या. त्या दिनांक 4/12/2007 रोजी उपस्थित गुत्तेदारांसमक्ष उघडण्यात आल्या. त्याचा तुलनात्मक तपशील पुढील प्रमाणे.

| | | |
|---|---|---|
| 1. | मे. अल्सन इलेक्ट्रीकल्स | 18.53% कमी दराने |
| 2. | मे. आकाश इलेक्ट्रीकल्स | 15.00% कमी दराने |
| 3. | मे. युनायटेड एजन्सीज | 7.00 % कमी दराने |
| 4. | मे. विश्व इलेक्ट्रीकल्स | **Technically Rejected** |

तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी म्हणजेच अंदाजपत्रकीय दरापेक्षा 18.53% कमी दराची मे.अल्सन इलेक्ट्रीकल्स यांची निविदा आहे. करीता मे.अल्सन इलेक्ट्रीकल्स यांची अं.प.दरापेक्षा 18.53% कमी दराची निविदा स्विकारणेस्तव प्रस्ताव मान्यतेस्तव तथा विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, , प्रभाग-ब मधील एन-6, एन-7, एन-8, एन-9, एन-11, एन-12 व एन-13 मधील पथदिव्यांची कॉम्प्रेहेन्सीव पध्दतीने वार्षिक देखभाल दुरूस्ती करण्याचे कामासाठी प्राप्त झ ालेल्या निविदांपैकी तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा **18.53%** कमी दराची **मे.अल्सन इलेक्ट्रीकल्स** यांची निविदा स्विकारणेस सर्वानुमते स्विकृतीसह मंजुरी देण्यात येते. कंत्राटदाराच्या कामाचा आढावा घेवुन समाधानकारकपणे काम करीत नसल्यास त्यांचे देखभाल दुरूस्तीचे काम उपलब्ध गुत्तेदारांकडून मान्य दराने करून घेण्यासही अनुमती देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. 285 :**

कार्यकारी अभियंता (ज.नि.,वि.,ड्रे.,इ. व उ.) यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, प्रभाग ड मधील वॉर्ड क्र. 33,36,37,38,39,58,59,60,61,62,63,64,65,91,94,95 मधील पथदिव्यांची कॉम्प्रेहेन्सीव पध्दतीने वार्षिक देखभाल दुरूस्ती करण्याचे अंदाजपत्रक रक्कम रू.39,67,300/- चे तयार करून त्यास सर्वसाधारण सभा ठराव क्र. 921 दि.18/7/2007 अन्वये मान्यता मिळाली आहे.

सदर कामाकरीता कार्यालयीन निविदा सुचना जा.क्र.मनपा/ई-निविदा/135/07, दि.21/11/2007 अन्वये प्रसिध्दीस दिली असता निविदा विक्रीच्या अंतिम दिवशी पाच निविदांची विक्री झाली व निविदा स्विकृतीच्या अंतिम दिवशी चार निविदा दर भरून प्राप्त झाल्या. त्या दिनांक 4/12/2007 रोजी उपस्थित गुत्तेदारांसमक्ष उघडण्यात आल्या. त्याचा तुलनात्मक तपशील पुढील प्रमाणे.

| | | |
|---|---|---|
| 1. | मे. ब्राईट इलेक्ट्रीकल वर्क्स | 27.64% कमी दराने |
| 2. | मे. मॅग्नेटीक इले. अँड इलेक्ट्रॉनीक | 21.66% कमी दराने |

3. मे. असन्सो लाईटस् 15.27 % कमी दराने
4. मे. आकाश इलेक्ट्रीकल्स 15.00 % कमी दराने

तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी म्हणजेच अंदाजपत्रकीय दरापेक्षा 27.64% कमी दराची मे.ब्राईट इलेक्ट्रीकल वर्क्स यांची निविदा आहे. करीता मे.ब्राईट इलेक्ट्रीकल वर्क्स यांची अं.प.दरापेक्षा 27.64% कमी दराची निविदा स्विकारणेस्तव प्रस्ताव मान्यतेस्तव तथा विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, प्रभाग-ड मधील वॉर्ड क्र 33, 36, 37, 38, 39, 58, 59, 60, 61, 62, 63, 64, 65, 91, 94, 95 मधील पथदिव्यांची कॉम्प्रेहेन्सीव पध्दतीने वार्षिक देखभाल दुरूस्ती करण्याचे कामासाठी प्राप्त झालेल्या निविदांपैकी तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा **27.64%** कमी दराची **मे.ब्राईट इलेक्ट्रीकल वर्क्स** यांची निविदा स्विकारणेस सर्वानुमते स्विकृतीसह मंजुरी देण्यात येते. कंत्राटदाराच्या कामाचा आढावा घेवुन समाधानकारकपणे काम करीत नसल्यास त्यांचे देखभाल दुरूस्तीचे काम उपलब्ध गुत्तेदारांकडून मान्य दराने करून घेण्यासही अनुमती देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. 286 :**

कार्यकारी अभियंता (ज.नि.,वि.,ड्रे.,इ. व उ.) यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, प्रभाग ई व ब मधील वॉर्ड क्र. 23, 70, 71, 73, 74, 75, 76, 77, 78, 79, 80, 81, 82, 83, 84, 2, 20, 21, 22, 14 मधील पथदिव्यांची कॉम्प्रेहेन्सीव पध्दतीने वार्षिक देखभाल दुरूस्ती करण्याचे अंदाजपत्रक रक्कम रू.39,07,357/- चे तयार करून त्यास सर्वसाधारण सभा ठराव क्र. 918 दि.18/7/2007 अन्वये मान्यता मिळाली आहे.

सदर कामाकरीता कार्यालयीन निविदा सुचना जा.क्र.मनपा/ई-निविदा/135/07, दि.21/11/2007 अन्वये प्रसिध्दीस दिली असता निविदा विक्रीच्या अंतिम दिवशी पाच निविदांची विक्री झाली व निविदा स्विकृतीच्या अंतिम दिवशी एक निविदा दर भरून प्राप्त झाल्या. त्या दिनांक 4/12/2007 रोजी उपस्थित गुत्तेदारांसमक्ष उघडण्यात आल्या. त्याचा तुलनात्मक तपशील पुढील प्रमाणे.

1. मे.बानेश्वर इलेक्ट्रीकल्स अँड इलेक्ट्रॉनीक औद्योगिक सहकारी संस्था लि. 14.43 % कमी दराने

तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी म्हणजेच अंदाजपत्रकीय दरापेक्षा 14.53% कमी दराची मे.बानेश्वर इलेक्ट्रीकल्स अँड इलेक्ट्रॉनीक औद्योगिक सहकारी संस्था लि. यांची निविदा आहे. करीता मे.बानेश्वर इलेक्ट्रीकल्स अँड इलेक्ट्रॉनीक औद्योगिक सहकारी संस्था लि. यांची अं.प.दरापेक्षा 14.53% कमी दराची निविदा स्विकारणेस्तव प्रस्ताव मान्यतेस्तव तथा विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे प्रभाग ई व ब मधील वॉर्ड क्र. 23, 70, 71, 73, 74, 75, 76, 77, 78, 79, 80, 81, 82, 83, 84, 2, 20, 21, 22, 14 मधील पथदिव्यांची कॉम्प्रेहेन्सीव पध्दतीने वार्षिक देखभाल दुरूस्ती करण्याचे कामासाठी प्राप्त झालेल्या निविदांपैकी तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा **14.53%** कमी दराची **मे. बानेश्वर इलेक्ट्रीकल्स अँड इलेक्ट्रॉनीक औद्योगिक सहकारी संस्था लि.** यांची निविदा स्विकारणेस सर्वानुमते स्विकृतीसह मंजुरी देण्यात येते. कंत्राटदाराच्या कामाचा आढावा घेवुन समाधानकारकपणे काम करीत नसल्यास त्यांचे देखभाल दुरूस्तीचे काम उपलब्ध गुत्तेदारांकडून मान्य दराने करून घेण्यासही अनुमती देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**<u>विषय क्र. 287 :</u>**

कार्यकारी अभियंता (ज.नि.,वि.,ड्रे.,इ. व उ.) यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, प्रभाग क मधील वॉर्ड क्र.27, 28, 29, 40, 41, 42, 43, 44, 45, 46, 51, 52, 53, 54, 55, 56, 57 मधील पथदिव्यांची कॉम्प्रेहेन्सीव पध्दतीने वार्षिक देखभाल दुरूस्ती करण्याचे अंदाजपत्रक रक्कम रू.32,30,100/- चे तयार करून त्यास सर्वसाधारण सभा ठराव क्र.916 दि.18/7/2007 अन्वये मान्यता मिळाली आहे.

सदर कामाकरीता कार्यालयीन निविदा सुचना जा.क्र.मनपा/ई-निविदा/135/07, दि.21/11/2007 अन्वये प्रसिध्दीस दिली असता निविदा विक्रीच्या अंतिम दिवशी दोन निविदांची विक्री झाली व निविदा स्विकृतीच्या अंतिम दिवशी दोन निविदा दर भरून प्राप्त झाल्या. त्या दिनांक 4/12/2007 रोजी उपस्थित गुत्तेदारांसमक्ष उघडण्यात आल्या. त्याचा तुलनात्मक तपशील पुढील प्रमाणे.

| | | |
|---|---|---|
| 1. | मे. लुना इलेक्ट्रीकल्स | अंदाजपत्रकीय दराने |
| 2. | मे. आकाश इलेक्ट्रीकल्स | **Technically Rejected** |

मे. लुना इलेक्ट्रीकल्स यांची अंदाजपत्रकीय दराची निविदा आहे. दिनांक 12/12/2007 रोजी मा.आयुक्तांचे दालनात संबंधीत एजन्सी मे.लुना इलेक्ट्रीकल्स यांचे सोबत झालेल्या दराच्या वाटाघाटी अंती 14.56% कमी दराने काम करण्याची संमती सदर एजन्सीने दिलेली आहे. करीता मे. लुना इलेक्ट्रीकल्स यांची अं.प.दरापेक्षा 14.56% कमी दराची निविदा स्विकारणेस्तव प्रस्ताव मान्यतेस्तव तथा विचारार्थ सादर.

**<u>ठराव :</u>**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे प्रभाग क मधील वॉर्ड क्र. 27, 28, 29, 40, 41, 42, 43, 44, 45, 46, 51, 52, 53, 54, 55, 56, 57 मधील पथदिव्यांची कॉम्प्रेहेन्सीव पध्दतीने वार्षिक देखभाल दुरूस्ती करण्याचे कामासाठी प्राप्त झालेल्या निविदांपैकी अंदाजपत्रकीय दराचे निविदाधारक **मे. लुना इलेक्ट्रीकल्स** यांचेशी झालेल्या वाटाघाटीअंती ठरल्यानुसार सदरील काम त्यांचेकडून अंदाजपत्रकीय दरापेक्षा **14.56%** कमी दराने करून घेण्यास सर्वानुमते स्विकृतीसह मंजुरी देण्यात येते. कंत्राटदाराच्या कामाचा आढावा घेवुन समाधानकारकपणे काम करीत नसल्यास त्यांचे देखभाल दुरूस्तीचे काम उपलब्ध गुत्तेदारांकडून मान्य दराने करून घेण्यासही अनुमती देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**<u>विषय क्र. 288 :</u>**

कार्यकारी अभियंता (ज.नि.,वि.,ड्रे.,इ. व उ.) यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, प्रभाग फ मधील वॉर्ड क्र. 50, 66, 67, 68, 69, 85, 86, 87, 88, 89, 90, 92, 93, 96, 97, 98 मधील पथदिव्यांची कॉम्प्रेहेन्सीव पध्दतीने वार्षिक देखभाल दुरूस्ती करण्याचे अंदाजपत्रक रक्कम रू.39,29,000/- चे तयार करून त्यास सर्वसाधारण सभा ठराव क्र.917 दि.18/7/2007 अन्वये मान्यता मिळाली आहे.

सदर कामाकरीता कार्यालयीन निविदा सुचना जा.क्र.मनपा/ई-निविदा/135/07, दि.21/11/2007 अन्वये प्रसिध्दीस दिली असता निविदा विक्रीच्या अंतिम दिवशी चार निविदांची विक्री झाली व निविदा स्विकृतीच्या अंतिम दिवशी चार निविदा दर भरून प्राप्त झाल्या. त्या दिनांक 4/12/2007 रोजी उपस्थित गुत्तेदारांसमक्ष उघडण्यात आल्या. त्याचा तुलनात्मक तपशील पुढील प्रमाणे.

| | | |
|---|---|---|
| 1. | मे. ब्राईट इलेक्ट्रीकल वर्क्स | 22.53% कमी दराने |
| 2. | मे. असन्सो इलेक्ट्रीकल्स | 15.15% कमी दराने |
| 3. | मे.बानेश्वर इलेक्ट्रीकल्स अँड इलेक्ट्रॉनीक औद्योगिक सहकारी संस्था लि. | 14.75 % कमी दराने |
| 4. | मे. आकाश एजन्सीज | 12.00 % कमी दराने |

तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी म्हणजेच अंदाजपत्रकीय दरापेक्षा 22.53% कमी दराची मे.ब्राईट इलेक्ट्रीकल्स यांची निविदा आहे. करीता मे. ब्राईट इलेक्ट्रीकल्स यांची अं.प.दरापेक्षा 22.53% कमी दराची निविदा स्विकारणेस्तव प्रस्ताव मान्यतेस्तव तथा विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे प्रभाग फ मधील वॉर्ड क्र.50, 66, 67, 68, 69, 85, 86, 87, 88, 89, 90, 92, 93, 96, 97, 98 मधील पथदिव्यांची कॉम्प्रेहेन्सीव पध्दतीने वार्षिक देखभाल दुरूस्ती करण्याचे कामासाठी प्राप्त झालेल्या निविदांपैकी तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा **22.53%** कमी दराची **मे. ब्राईट इलेक्ट्रीकल्स** यांची निविदा स्विकारणेस सर्वानुमते स्विकृतीसह मंजुरी देण्यात येते. कंत्राटदाराच्या कामाचा आढावा घेवुन समाधानकारकपणे काम करीत नसल्यास त्यांचे देखभाल दुरूस्तीचे काम उपलब्ध गुत्तेदारांकडून मान्य दराने करून घेण्यासही अनुमती देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. 289 :**

कार्यकारी अभियंता (ज.नि.,वि.,ड्रे.,इ. व उ.) यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, प्रभाग अ मधील वॉर्ड क्र.1, 4, 5, 6, 7, 8, 9, 10, 11, 12, 13, 30, 31, 32, 34 मधील पथदिव्यांची कॉम्प्रेहेन्सीव पध्दतीने वार्षिक देखभाल दुरूस्ती करण्याचे अंदाजपत्रक रक्कम रू.38,96,850/- चे तयार करून त्यास सर्वसाधारण सभा ठराव क्र.922 दि.18/7/2007 अन्वये मान्यता मिळाली आहे.

सदर कामाकरीता कार्यालयीन निविदा सुचना जा.क्र.मनपा/ई-निविदा/135/07, दि.21/11/2007 अन्वये प्रसिध्दीस दिली असता निविदा विक्रीच्या अंतिम दिवशी तीन निविदांची विक्री झाली व निविदा स्विकृतीच्या अंतिम दिवशी दोन निविदा दर भरून प्राप्त झाल्या. त्या दिनांक 4/12/2007 रोजी उपस्थित गुत्तेदारांसमक्ष उघडण्यात आल्या. त्याचा तुलनात्मक तपशील पुढील प्रमाणे.

| | | |
|---|---|---|
| 1. | मे. आकाश इलेक्ट्रीकल्स | 5.00% कमी दराने |
| 2. | मे. लुना इलेक्ट्रीकल्स | अंदाजपत्रकीय दराने |

तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी म्हणजेच अंदाजपत्रकीय दरापेक्षा 5.00% कमी दराची मे.आकाश इलेक्ट्रीकल्स यांची निविदा आहे. करीता मे. आकाश इलेक्ट्रीकल्स यांची अं.प.दरापेक्षा 5.00% कमी दराची निविदा स्विकारणेस्तव प्रस्ताव मान्यतेस्तव तथा विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे प्रभाग अ मधील वॉर्ड क्र.1, 4, 5, 6, 7, 8, 9, 10, 11, 12, 13, 30, 31, 32, 34 मधील पथदिव्यांची कॉम्प्रेहेन्सीव पध्दतीने वार्षिक देखभाल दुरूस्ती करण्याचे कामासाठी प्राप्त झालेल्या निविदांपैकी तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा **5%** कमी दराची **मे. आकाश इलेक्ट्रीकल्स** यांची निविदा स्विकारणेस सर्वानुमते स्विकृतीसह मंजुरी देण्यात येते. कंत्राटदाराच्या कामाचा आढावा घेवुन समाधानकारकपणे काम करीत नसल्यास त्यांचे देखभाल दुरूस्तीचे काम उपलब्ध गुत्तेदारांकडून मान्य दराने करून घेण्यासही अनुमती देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. 290 :**

मा.आयुक्त प्रस्ताव सादर करीत आहेत की, वॉर्ड कार्यालयाचे कार्यक्षेत्रातील मालमत्ता व पाणीपट्टी वसुलीच्या कामासाठी व औरंगाबाद महानगरपालिकेच्या मालकीच्या मनपा हद्दीतील मालमत्तांच्या संरक्षणासाठी तसेच शहरातील महापुरूषांच्या पुतळयांच्या संरक्षणासाठी व सिडकोतील प्रशासकीय विभागासाठी सुमारे 219 सुरक्षा रक्षकांची आवश्यकता आहे. त्यासाठी खाजगी सुरक्षा रक्षकांची व्यवस्था करणे करीता जाहीर निविदा मागविण्यात आल्या असता खालीलप्रमाणे निविदा प्राप्त झाल्या.

| अ. क्र. | निविदा धारकाचे नांव | सुरक्षा रक्षक यांचे मासिक | शेरा |
|---|---|---|---|

| | | वेतन | |
|---|---|---|---|
| 1 | मेडीएटर व अजिंठा प्रा.लि. | रू.4741.00 | घरभाडे, रजा, सार्वजनिक सुटीचा मोबदला नमुद केलेला नाही. |
| 2 | औरंगाबाद मल्टी सर्व्हीसेस | रू.4991.92 | घरभाडे, उपदान व सेवाकर नमूद केलेले नाही. |
| 3 | मे. भारत लेबर सप्लायर्स | रू.4645.00 | घरभाडे व सेवाकर नमूद केलेले नाही. |
| 4 | आय.एस.एफ. सर्व्हीसेस | रू.4863.00 | |
| 5 | महाराणा सेक्युरिटी व लेबर सप्लायर्स | रू.4395.92 | सेवाकर, घरभाडे, रजा, सार्वजनिक सुटीचे विवरण नमूद केलेले नाही. |
| 6 | इम्पॅक्ट सर्व्हीसेस | रू.3962.00 | घरभाडे, रजा, उपदान व सार्वजनिक सुटीचे विवरण नमूद केलेले नाही. |

महाराष्ट्र शासनाने अधिसुचना क्रमांक एस.जी.-9/142001/915/कामगार-5, दि.12 नोव्हेंबर 2002 अन्वये औरंगाबाद जिल्ह्यासाठी महाराष्ट्र खाजगी सुरक्षा रक्षक (नोकरीचे नियमन व कल्याण) अधिनियम 1981 व महाराष्ट्र खाजगी सुरक्षा रक्षक (नोकरीचे नियमन व कल्याण योजना 2002) लागू केलेलेली आहे.

महाराष्ट्र शासनाने अधिसूचना क्रमांक एसजीए-132002/202/12/5, दि.6 फेब्रुवारी 2003 अन्वये औरंगाबाद जिल्हा सुरक्षा रक्षक एक सदस्यीय मंडळ स्थापन केलेले आहे. महाराष्ट्र खाजगी सुरक्षा रक्षक (नोकरीचे नियमन व कल्याण) अधिनियम 1981 च्या कलम 6 नुसार एक सदस्यीय मंडळाच्या अधिकाराचा वापर करून व महाराष्ट्र खाजगी सुरक्षा रक्षक (नोकरीचे नियमन व कल्याण) अधिनियम 1981 च्या कलम 03(2)(5) व महाराष्ट्र खाजगी सुरक्षा रक्षक (नोकरीचे नियमन व कल्याण) अधिनियम 2002 मधील खंड 30 अन्वये सुरक्षा रक्षकांचे व सुरक्षा पर्यवेक्षकांचे वेतन खालील प्रमाणे निश्चित केलेले आहे.

1. **सुरक्षा रक्षक**

एकूण देय वेतन रू.2905 X 42% = 1220

एकूण देय रक्कम रू.**4125.00** + सर्व्हीस चार्ज व शासनाचा सेवा कर वेगळा राहील.

दि.30.3.2007 रोजी संपन्न झालेल्या स्थायी समिती सभेचे इतिवृत्ता(का.प.क्र.26) अन्वये विषय क्र.354 प्रस्ताव क्र.284 अन्वये मा.स्थायी समितीने सुरक्षा बोर्डाच्या नियमाप्रमाणे ठराव पारित केलेले आहे. कृपया त्याचे अवलोकन व्हावे.

सर्व निविदा धारकांनी सुरक्षा रक्षकाचे एकूण देय वेतन रूपये 2905/-सारखेच नमूद केलेले आहे. इतर भत्ते नमूद करतांनी सर्वांनी वेगवेगळे दर दिलेले आहेत. इतर भत्त्यांमध्ये सर्वांच्या विवरणामध्ये विसंगती आहे. त्यामुळे त्याचा विचार करणे योग्य होणार नाही.

करीता बोर्डाच्या नियमाचा विचार करता वेतन देण्याचा नियम हा बंधनकारक असल्यामुळे तेच वेतन देय राहील. उपरोक्त निविदा धारकांमध्ये महापुरूषांचे पुतळे, आरोग्य विभाग दवाखाने, उद्याने सिडको, मालमत्ता सिडको, प्राणी संग्रहालय, मनपा मालमत्ता, पाणी पुरवठा विभाग जलकुंभावर, नक्षत्रवाडी एमबीआर, जलतरण विभाग, शिक्षण विभाग, मुख्य कार्यालयामध्ये आवश्यक ठिकाणी सुरक्षा रक्षकांची आवश्यकता लक्षात घेऊन एकूण 219 सुरक्षा रक्षकांची विभाग निहाय विभागणी करून एजन्सीला नेमणूक देणे योग्य राहील असे प्रशासनाचे मत आहे. खालील प्रमाणे कामाची विभागाणी करण्यात येते.

| अ.क्र. | विभाग/ठिकाणचे नांव | संख्या | एजन्सीचे नांव |
|---|---|---|---|
| 1. | मा. महापुरूषांचे पुतळे | 36 | मेडीएटर व अजिंठा प्रा.लि. |
| 2. | प्रशासकीय विभाग | 36 | आय.एस.एफ. सर्व्हीसेस |
| 3. | मनपा मालमत्ता, इमारत व आरोग्य विभाग | 36 | महाराणा सेक्युरिटी व लेबर सप्लायर्स |
| 4. | जलकुंभ नक्षत्रवाडी व पाण्याची टाकी एस.बी.आर., जलतरण, सिध्दार्थ गार्डन, पशुवैद्यकीय विभाग, शिक्षण विभाग, मौलाना आझाद संशोधन केंद्र. | 36 | औरंगाबाद मल्टी सर्व्हीसेस |
| 5. | सिडको मालमत्ता व उद्यान, मनपा मुख्य कार्यालय, वॉर्ड कार्यालय | 36 | भारत लेबर सप्लायर्स |
| 6. | इतर अत्यावश्यक सेवा व बदली सुरक्षा रक्षक, ज्योतीनगर गार्डन, चुना भट्टी व इतर | 39 | इम्पॅक्ट सर्व्हीसेस |

सदरील कामाचा कालावधी हा 1 वर्षाचा असून कामाचे आदेश देण्याच्या तारखेपासुन 1 वर्षाचा कालावधीसाठी गृहीत धरण्यात येईल. खाजगी सुरक्षा रक्षक एजन्सीच्या नेमणुकीबाबत करारनाम्यातील अटी व शर्तीच्या अधिन राहून पुढील कामाचे कार्यादेश देण्यात येतील.

करीता उपरोक्त प्रस्ताव मान्यतेस्तव व विचारार्थ सादर.

संवाद :

श्री. रशीद खान मामू : खाजगी सुरक्षा रक्षकांची नेमणूक करण्याच्या संदर्भात प्रशासकीय कामकाजाचे नियंत्रणाचे दृष्टीने एजन्सीजचा कामाचा अनुभव लक्षात घेता महाराणा सेक्युरिटी व लेबर सप्लायर्स, आय.एस.एफ. सर्व्हीसेस या दोन एजन्सीजना सारख्या प्रमाणात सुरक्षा रक्षक पुरविण्याचे काम देण्यात यावे.

श्री.अ.साजेद अ.सत्तार : दोन एजन्सीजना सदरील काम विभागून देण्यात यावे.

डॉ.आशा बिनवडे
श्री.मधुकर सावंत : सहा एजन्सीला काम देण्याऐवजी दोन एजन्सीला देण्यात यावे. नियंत्रणासाठी सुलभ होईल.

मा. सभापती : स.सदस्य श्री.रशीद मामू व इतर स. सदस्यांनी सूचना केल्यानुसार प्रशासकीय कामकाजाचे नियंत्रणाचे दृष्टीने एजन्सीजचा कामाचा अनुभव लक्षात घेता महाराणा सेक्युरिटी व लेबर सप्लायर्स, आय.एस.एफ. सर्व्हीसेस या दोन एजन्सीजना सारख्या प्रमाणात सुरक्षा रक्षक पुरविण्याचे काम देण्यास स्विकृतीसह मंजुरी देण्यात येते.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे व सभागृहात झालेल्या चर्चेनुसार वॉर्ड कार्यालयाचे कार्यक्षेत्रातील मालमत्ता व पाणीपट्टी वसुलीच्या कामासाठी व औरंगाबाद महानगरपालिकेच्या मालकीच्या मनपा हद्दीतील मालमत्तांच्या संरक्षणासाठी तसेच शहरातील महापुरूषांच्या पुतळ्यांच्या संरक्षणासाठी व सिडकोतील प्रशासकीय विभागासाठी आवश्यक असणाऱ्या सुमारे 219 खाजगी सुरक्षा रक्षकांची व्यवस्था करणे करीता प्राप्त झालेल्या निविदांपैकी 1. आय.एस.एफ.सर्व्हीसेस व 2. महाराणा सेक्युरिटी व लेबर सप्लायर्स या दोन एजन्सीजना सम प्रमाणात (निम्मे-निम्मे) सुरक्षा रक्षक पुरविण्याचे काम खाजगी सुरक्षा रक्षक एजन्सीच्या नेमणुकीबाबत करारनाम्यातील अटी व शर्तीच्या अधिन राहून एक वर्षाच्या कालावधीसाठी खालील नमूद केलेल्या (देय वेतन+देय रक्कम) दरानुसार विभागून देण्यास सर्वानुमते स्विकृतीसह मंजुरी देण्यात येते.

एकूण देय वेतन रू.2905 X 42% = 1220

एकूण देय रक्कम रू.**4125.00** + सर्व्हीस चार्ज व शासनाचा सेवा कर वेगळा राहील.
वैधानिक कार्यवाही व्हावी.

**<u>विषय क्र. 291 :</u>**

अतिरिक्त शहर अभियंता, महानगरपालिका औरंगाबाद यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, घन कचरा हाताळणी व व्यवस्थापनाची कार्यवाही मा.सर्वोच्च न्यायालयाने दिलेल्या निर्देशानुसार आणि वने, पर्यावरण मंत्रालय, भारत सरकार यांच्या 25 सप्टेंबर 2000 च्या नोटीफिकेशन प्रमाणे करणे आवश्यक आहे. तसेच महाराष्ट्र शासनाने घन कचरा व्यवस्थापन नियम 2000 ची अंमलबजावणी दिनांक 30 एप्रिल 2007 पर्यंत करण्याचे निर्देश सर्व महानगरपालिकांना दिले आहेत.

**<u>घन कचरा व्यवस्थापन नियम 2000 मधील मुद्दे :</u>**

1. कचरा इतस्ततः न टाकता तो एकत्रित जमा करण्यासाठी आवश्यक त्या सुविधा नागरिकांना पुरविणे.
2. कचरा वेगवेगळा जमा करून (ओला कचरा व सुका कचरा) वेगवेगळ्या कचरा कुंड्यात टाकणे.
3. घरोघर जावुन कचरा जमा करून, त्याची वाहतुक डंपींग स्टेशन पर्यंत करणे.
4. कचऱ्याची वाहतुक बंद वाहनातून करणे.
5. कचऱ्याची हाताळणी करतांना मानवी बळाचा वापर कमी करून यांत्रिकी पध्दतीने हाताळणी करणे.

औरंगाबाद महानगरपालिकेत सध्या कचरा वाहतूक घंटागाड्या मनपाच्या ट्रक, डंपर, कंटेनर, डंपरप्लेसर याद्वारे करण्यात येत आहे. डंपर व ट्रक्स कचऱ्याने भरल्यानंतर ताडपत्रीने झाकुनच कचरा डेपोवर नेले जातात, परंतु कचरा वाहतुकीसाठी बंद बॉडीचीच वाहने वापरावी असा नियम असल्याने त्या नियमांचे उल्लंघन होत आहे. उघड्या कचराकुंड्या असू नयेत व मानवी हाताने त्याची हाताळणी करू नये, असे नियम असतांना आपल्याकडे यांत्रिक साधने उपलब्ध नसल्याने कामगारांकडूनच कचरा उचलण्याचे काम करून घ्यावे लागते. सदरची कार्यपध्दती ही मा.सर्वोच्च न्यायालयाच्या नियमांविरूध्द आहे व अशा प्रकारे नियमांचे पालन होत नसल्याने मा.न्यायालयाकडून दंडात्मक कार्यवाही देखील होण्याची शक्यता नाकारता येत नाही.

पर्यावरण संरक्षण कायद्या अंतर्गत खालील प्रमाणे नियमावली तयार असुन, नियमावलीनुसार ज्या नगरपालिका व महानगरपालिका कार्यवाही करणार नाहीत, त्यांचेवर सेक्शन 15, 16, 17, 18, इपीजे 1986(29) अन्वये,

1) सरकारी खात्याकडून दिरंगाई झाल्यास कलम 15 व 17 अंतर्गत दंडात्मक कार्यवाही होवु शकते.
2) दंडात्मक कार्यवाही व शिक्षा ही सेक्शन 15 मध्ये विहीत केली असून 5 वर्षा पर्यंत कारावास किंवा 1 लाखा पर्यंतदंड किंवा दोन्ही प्रकारची कार्यवाही होवु शकते.

पर्यावरण संरक्षण कायदा 1986 (29) कलम 17 अन्वये सरकारी खात्या अंतर्गत होणारे गुन्हे कुठल्याही अधिकाऱ्यांनी दुर्लक्ष केल्यामुळे किंवा दुर्लक्ष करण्यासाठी संधी दिल्याने सदरचा अधिकारी शिक्षेस पात्र राहील.

सध्या आपल्याकडे कार्यरत यंत्रणा ही अपुरी असून नियमांचे उल्लंघन होत असल्याने अनेक कायदेशीर समस्या निर्माण होवू शकतात.

- घन कचरा व्यवस्थापनाच्या नियमामध्ये झालेल्या अमुलाग्र बदलांचे पालन करण्याच्या दृष्टीने औरंगाबाद महानगरपालिकेने या कामी All India Institute of Local Self Govt., Mumbai या संस्थेची Project Management Consultant (PMC) म्हणुन नियुक्ती केली आहे.
- All India Institute of Local Self Govt., Mumbai यांनी औरंगाबाद शहराच्या घनकचरा व्यवस्थापनासाठी केलेल्या सखोल अभ्यासाद्वारे तयार केलेल्या प्रकल्प अहवालास सर्वसाधारण सभेने विषय क्र.963 दि.18.7.2007 अन्वये सर्वानुमते स्विकृतीसह मंजुरी दिली आहे व वैधानिक कार्यवाही करण्याचा ठराव पारित केला आहे.

त्यानंतर निविदा सुचनेचे जाहीर प्रकटन दैनिक लोकमत, दै.हिंदुस्थान टाईम्स व दै.नवभारत या वर्तमानपत्रात देण्यात आले. तसेच इ-टेंडरींग पध्दतीनुसार महानगरपालिकेच्या वेबसाईटवर निविदा सुचना प्रसिध्द करण्यात आली. दिनांक 3 सप्टेंबर 2007 रोजी Pre-bid meeting घेण्यात येवुन त्यामध्ये उपस्थित bidder बरोबर चर्चा करून काही निर्णय घेण्यात आले. नवीन वाहनांचे आयुष्य हे दहा वर्षे असल्यामुळे 7 वर्षाच्या कालावधीनंतर देखील आणखीन 3 वर्षे जास्ती पर्यंत त्याचा वापर करू शकतो. या मुद्यावर

तांत्रिकदृष्ट्या व आर्थिकदृष्ट्या विचार करून निविदेचा कालावधी 7 वर्षावरून 10 वर्षापर्यंत सर्वानुमते वाढविण्यात आला.

महानगरपालिकेतर्फे डिस्पोझल साईटवर वर्कशॉप व पार्कींग करीता एक हेक्टर जागा देण्याचे ठरले. परंतु जर संबंधीत कंत्राटदार यांना शहर विभागात कार्यालय, पार्कींग व वर्कशॉपसाठी जागा घ्यावयाची असेल तर त्यांच्या स्वतःच्या खर्चाने घ्यावी लागेल. त्यासाठी महानगरपालिका वेगळा खर्च देणार नाही.

सर्व बिडर्सना इ-टेंडरींग पध्दतीची माहिती देण्यात आली. दिनांक 17.9.2007 रोजी दुसऱ्यांदा प्रि-बिड मिटींग घेण्यात आली. यामध्ये टेंडर स्विकृतीची मुदत 13.9.2007 ऐवजी वाढवून 18.9.2007 करण्यात आली.

एकूण पाच टेंडर विक्री झाले. परंतु फक्त एकच टेंडर प्राप्त झाले व सिंगल टेंडर आल्यामुळे दुसऱ्या वेळी निविदा सुचना वर्तमानपत्रात व वेबसाईटवर प्रसिध्द करण्यात आली. त्यानुसार निविदा स्विकृतीची तारीख दिनांक 5.10.2007 देण्यात आली व दिनांक 27.9.2007 रोजी प्रिबिड मिटींग घेण्यात आली.

एकूण पाच निविदा विक्री झाल्या व खालील प्रमाणे चार निविदा प्राप्त झाल्या.

1. **M/s. Sham Narayan & Brothers, Mumbai.**
2. **M/s. Center for Development Communication, Jaipur.**
3. **M/s. Ramky Enviro Engineers Ltd., Hyderabad.**
4. **M/s. Antony Waste handling cell Pvt. Ltd., Mumbai**

दिनांक 6.10.2007 रोजी E-Tendering विभागात निविदेची Technical Bid उघडण्यात आली. निविदेमधील अटी/शर्तींचे पालन न केल्यामुळे दोन निविदा फायनान्सीयल बिड उघडण्याकरीता अपात्र ठरविण्यात आल्या.

दिनांक 20.10.2007 रोजी तांत्रिकदृष्ट्या पात्र असलेल्या दोन निविदाधारकांची कमर्शियल बिड उघडण्यात आली. त्यांनी दहा वर्षाच्या कालावधीसाठी दिलेले दर खालील प्रमाणे आहेत.

1. **M/s. Antony Waste handling cell Pvt. Ltd., Mumbai** — **Rs.118.45 Crores**
2. **M/s. Ramky Enviro Engineers Ltd., Hyderabad.** — **Rs.110.98 Crores**

**M/s. Ramky Enviro Engineers Ltd., Hyderabad** यांची निविदा तुलनात्मकदृष्ट्या कमी दराची आहे. मा.आयुक्त, मनपा औरंगाबाद यांनी **M/s. Ramky Enviro Engineers Ltd., Hyderabad** यांना प्रत्यक्ष वाटाघाटीस हजर राहण्याचे कळविले. वाटाघाटीअंती **M/s. Ramky Enviro Engineers Ltd., Hyderabad** यांनी त्यांचे दर रूपये 108.5 कोटी पर्यंत कमी करण्याचे मान्य केले आहे.

**<u>कंत्राटदाराच्या कामाचे स्वरूप पुढील प्रमाणे राहील.</u>**

1) घरोघरी जावुन कचऱ्याचे संकलन करणे, ओला कचरा व सुका कचरा वेगवेगळा जमा करणे.
2) घरोघरी जावुन जमा केलेला कचरा छोट्या बंद वाहनातुन मोठ्या कॉम्पॅक्टर्स पर्यन्त वाहुन नेणे व त्यात ट्रान्सफर करणे.
3) मोठ्या कॉम्पॅक्टर्सद्वारा कचऱ्याचे वहन डंपींग ग्राऊंड पर्यंत करणे.
4) घन कचरा व्यवस्थापनाच्या नियमामध्ये झालेल्या अमुलाग्र बदलांविषयी जनजागृती कार्यक्रम राबविणे.
5) डब्रीज, ग्रीन वेस्ट (पालापाचोळा), यांचे संकलन आणि वहन स्वतंत्रपणे डंपरप्लेसर्स, हुक लोडर्स द्वारे करणे.

**M/s. Ramky Enviro Engineers Ltd., Hyderabad** हे पुढील प्रमाणे बंद वाहने, मशिनरीज, इक्वीपमेंट पुरवठा करणार आहेत.

| **Sr. No.** | **Item** | **Minimum Requirement** | **Number offered by** |
|---|---|---|---|

| | | of AMC | Ramky |
|---|---|---|---|
| 1) | Litter bins 50 Liters units | **770** | **770** |
| 2) | Transfer point bin 1100 liters units | **340** | **374** |
| 3) | Bulk Generators bins, units | **660** | **660** |
| 4) | Skip bins 4500 liters units | **06** | **06** |
| 5) | Hook lift container 8000 lit. units | **01** | **01** |
| 6) | Hand carts with 60 lit. bins, units | **200** | **200** |
| 7) | Tricycle 330 lit. container units | **57** | **57** |
| 8) | Mini truck 750 kilograms 1.5 GVW units | **34** | **35** |
| 9) | Compactor small 5-6 ft., 10-11 GVW units | **17** | **19** |
| 10) | Compactor 8 medium 8 T, 16 GVW units | **11** | **12** |
| 11) | Skip loader 3-4T, 11 GVW units | **01** | **01** |
| 12) | Hook lift truck, 8T 16 GVW units | **01** | **01** |
| 13) | Excavator, loader backhoe, units | **01** | **01** |

तसेच बिन्स ठेवण्यासाठी सिमेंट कॉंक्रीट प्लॅटफॉर्म उभारणे, कम्युनिकेशन सिस्टीमची व्यवस्था करणे, स्वतःचे कार्यालय व वर्कशॉप स्थापन करणे, 30 टनी वेइंग ब्रीज इतर सुविधांसह उभारणे, जी.पी.एस. सिस्टीमची व्यवस्था करणे इत्यादी सुविधा कंत्राटदाराने उभारावयाच्या आहेत.

**M/s. Ramky Enviro Engineers Ltd., Hyderabad** यांनी पुरवठा केलेल्या सर्व बंद वाहनांची देखभाल, निगा, दुरूस्ती इत्यादीची जबाबदारी त्यांचीच असेल, तसेच घनकचरा व्यवस्थापनाच्या कामासाठी लागणारे मनुष्यबळ संबंधीत कंत्राटदारानेच पुरवावयाचे असून त्यांचे वेतन कामगार कायद्यानुसार द्यावयाचे आहे. घन कचरा व्यवस्थापनाच्या नियमामध्ये झालेल्या अमुलाग्र बदला विषयी औरंगाबाद शहरामध्ये जनजागृती करण्यासाठी खास जनजागृती कार्यक्रम प्रभावीपणे राबविण्याची जबाबदारी देखील कंत्राटदाराचीच असेल.

कंत्राटदारास घन कचरा हाताळणी व व्यवस्थापनातील विविध मुद्यांच्या मुल्यमापनावरून बिलाची अदायी करण्यात येईल. कंत्राटदाराच्या कामाचे मुल्यमापन, औरंगाबाद महानगरपालिकेचे संबंधीत स्वच्छता निरीक्षक, वॉर्ड अधिकारी हे करतील. कंत्राटदाराचे काम 100 टक्के समाधानकारक असेल तरच संपूर्ण बिलाची अदायी करण्यात येईल, अन्यथा मुल्यमापनाच्या प्रमाणात बिलातील रक्कमेत कपात करण्यात येईल. एकुणच औरंगाबाद शहराच्या संपूर्ण स्वच्छतेसाठी व नागरी आरोगयासाठी प्रभावी उपाययोजना या प्रकल्पाद्वारे राबविण्यात येणार आहेत.

करीता **M/s. Ramky Enviro Engineers Ltd., Hyderabad** यांनी दाखल केलेली घन कचरा व्यवस्थापन व हाताळणी संबंधीची 10 वर्षे मुदतीची व रूपये 108.5 कोटी खर्चाची निविदा मंजुरीस्तव सादर.

**संवाद :**

श्री.अ.रशीद खान : यासाठी जागा बघीतली का?

श्री.अ.साजेद अ.सत्तार : यापुर्वे सात वर्षासाठी दिले होते, नंतर 10 वर्षासाठी केले. हा प्रस्ताव रद्द करावा.

डॉ.आशा बिनवडे : या विषयाच्या पान क्र.2 वर असे दिले की, तांत्रिकदृष्ट्या व आर्थिकदृष्ट्या विचार करून निविदेचा कालावधी 7 वर्षावरून 10 वर्षापर्यंत सर्वानुमते वाढविण्यात आला. सर्वानुमते म्हणजे कुणाच्या परवानगीने वाढविण्यात आला. असा कुणाच्याही मताने तो वाढविता येतो का याचा खुलासा व्हावा. 108 कोटी, जवळपास वर्षाला 11 कोटी रूपये द्यायचे आहेत. यापुर्वी घनकचरा व्यवस्थापनावर म्हणजे घरापासून कचरा डिस्पोजल करण्यासाठी वर्षाला किती खर्च येत होता. यासाठी वर्षाला 11 कोटी खर्च येतो का?

श्री. मधुकर सावंत : जागा कोठे आहे?

अति.शहर अभियंता : यासाठी नारेगांवच्या पुढे जागा फायनल झालेली आहे.

श्री.मधुकर सावंत : मा.उच्च न्यायालयाचे नारेगांव भागात कचरा न टाकण्याचे आदेश असतांना पुन्हा त्या भागात कचरा टाकण्याचे सांगतात.

श्री.संजय शिरसाट : प्रस्ताव ज्यांनी ठेवला त्यांची कीव करावीशी वाटते, यात असे दिले की, बंद बॉडीचेच वाहन वापरावे असा नियम आहे. त्या नियमाचे उल्लंघन होत आहे. तसेच उघड्या कचरा कुंड्या असू नये व मानवी हाताने त्यांची हाताळणी करू नये. असे नियम असतांना आपल्याकडे यांत्रिक साधने उपलब्ध नसल्याने कामगारांकडूनच कचरा उचलण्याचे काम करून घ्यावे लागते. सदरची कार्यपध्दती ही मा.सर्वोच्च न्यायालयाच्या नियमाविरूध्द आहे व अशा प्रकारे नियमाचे पालन होत नसल्याने मा.न्यायालयाकडून दंडात्मक कार्यवाही देखील होण्याची शक्यता नाकारता येत नाही, असे स्पष्ट दिले आहे. हे आज प्रशासनाला कळाले. मा.सर्वोच्च न्यायालयाने कोणत्या वर्षी निर्देश दिलेले आहेत, प्रस्ताव देतांना त्यात ॲफीडेव्हीट टाईप देतो की, महापालिका नियमांचे उल्लंघन करते. दंडात्मक कार्यवाही महापालिकेवर होवू शकते. पर्यावरण विभागाने नारेगांव येथील कचरा डेपो बंद करावा म्हणून नोटीस कोणत्या वर्षी दिली होती. पर्यावरण विभागाने केलेले नियम आता विषयपत्रिकेत प्रस्तावात टाकले जाते. मा.सर्वोच्च न्यायालयाचे आदेश कोणत्या वर्षाचे आहेत?

श्री. संजय शिरसाट : सात वर्ष होत आहे आज प्रस्ताव येतो. या प्रस्तावात जे लिहिले ते जरी मा. न्यायालयात सादर केले तरी महापालिकेला दंडात्मक कार्यवाही होवू शकेल यात तसे नमूद केलेले आहे. जेथे घनकचरा व्यवस्थपन करणार आहे. त्या ग्राउंडसाठी ब-याच एनओसी लागतात. त्यानंतर जागा संपादीत होते. एनओसी मिळाली असेल व जागा संपादीत झाली असेल तर त्या जागेचा गट नंबर द्यावा. जागा अधांतरी असतांना एजन्सी फिक्स करण्याचा प्रस्ताव येतो हे योग्य नाही. ही घाई करीत आहे एजन्सी फिक्स केली की न्यायालयाला सांगात येईल की कार्यवाही चालू आहे, यासाठी हे असावे. त्या एजन्सीने टेंडर भरले असेल तर त्यांचेकडे 30 ते 40 एकर जागा पाहिजे होती.

अति.शहर अभियंता : कचरा डेपोचा हा विषय नाही. शहरातील घनकचरा व्यवस्थापन हाताळणीचा विषय आहे. जागेच्या बाबतीत मला माहिती नाही. निविदा पासून हे प्रकरण माझ याकडे आले.

श्री.संजय शिरसाट : त्याच्याशी संलग्न हा विषय आहे. चार एजन्सी येतात मा.आयुक्तांच्या दालनात चर्चा करतात. त्यांचे गाडीचे लाईफ हे 7 वर्ष सुटेबल त्यांना वाटत नाही म्हणून 10

वर्षासाठी दिले जाते. सर्वानुमते म्हणजे ठेकेदार व आयुक्त का, सर्वसाधारण सभेचा काही संबध येत नाही का?

अति.शहर अभियंता : हा जेव्हा प्रकल्प राबवायचा होता तेंव्हा लोकल सेल्फ गव्हर्नमेंन्टकडून प्रोजेक्ट रिपोर्ट घेतला. त्यात सात वर्षाची मुदत दिली होती. त्याप्रमाणे निविदा काढलेल्या होत्या. निविदा अंतिम करण्याच्या अगोदर जे काही निविदा धारक होते त्यांची बैठक घेतली गेली. त्यांनी सात वर्षाचा कालावधी अपुरा होतो, गाडीचे लाईफ हे दहा वर्षाचे असते असे म्हटले म्हणून दहा वर्ष केलेले आहे.

श्री.संजय शिरसाट : सेमी गव्हर्नमेंन्टची जी एजन्सी होती त्यांनी सात वर्ष म्हटले. गाडीचे आयुष्य 10 वर्षाचे असते असे ते ठरविणारे कोण असा प्रश्न येतो.

डॉ.आशा बिनवडे : सॉलीडवेस्ट साठी 10 वर्षाचा ठेका शासनाने ठरविला नाही.

अति.शहर अभियंता : मा.आयुक्तांनी त्यांचे अधिकार वापरून पाठवले. मंजूर करायचे की नाही हा सभागृहाचा विषय आहे.

डॉ.आशा बिनवडे : यापूर्वी यासाठी वार्षिक खर्च किती होत होता.

अति.शहर अभियंता : वार्षिक खर्च यापूर्वी 8 कोटी येत असे.

श्री.संजय शिरसाट : यात चालढकल पणा करणे यात दिसून येते की 7 वर्षाऐवजी 10 वर्ष करणे असे मा.आयुक्त ठेकेदाराच्या सम्मतीने करता येत नाही म्हणून हा विषय रद्द करावा किंवा पुन्हा ठेवणार असेल तर तपशीलवार ठेवावा अशा सुचना कराव्यात.

श्री.अ.रशिद खान : जेथे जागा घेतली एनओसी घेतलेली आहे अग्निशमन विभागाची तसेच आरोग्य विभागाची एन.ओ.सी. घेतली का?

मा. सभापती : घनकचरा हाताळणी संबंधीची मुदत 7 किंवा दहा वर्षे करण्याचा अधिकार सर्वसाधारण सभेला आहे. हा अधिकार प्रशासनाला नाही. सदर प्रकल्पाची दहा वर्षाची मुदत ठेवण्यासाठी सर्वसाधारण सभेची मंजुरी झालेली नाही. सर्वसाधारण सभेमध्ये याबद्दल धोरण ठरवण्यात आल्यानंतरच त्या अनुषंगाने हा प्रस्ताव पुन्हा स्थायी समिती समोर सादर करावा. करीता सर्वसाधारण सभेकडे शिफारस करण्यात येते.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे व सभागृहात झालेल्या चर्चेनुसार घनकचरा हाताळणी संबंधी प्रकल्पाची मुदत ठरविण्याच्या धोरणात्मक निर्णयासाठी प्रस्तावसर्वसाधारण सभेपुढे पाठविण्यास मंजुरी देण्यात येते. तसेच सर्वसाधारण सभेच्या निर्णयानंतर त्या अनुषंगाने प्रस्ताव स्थायी समिती समोर ठेवण्यास मान्यता देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. 292 :**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, प्रभाग क्र.21 नारेगांव मधील मिसरवाडी वसाती अंतर्गत खडीकरण करणेच्या कामाचे सा.बां.विभागाच्या सन 2006-07 च्या दरसूचीनुसार रक्कम रू.13,23,400/- च्या अंदाजपत्रकास मा.सर्वसाधारण सभेची दि.20/6/2007 अन्वये मंजुरी प्राप्त आहे. सदरील काम नागरी दलित वस्ती सुधार योजनेमधून प्रस्तावित आहे. सदर कामासाठी निविदापत्रके मागविली असता, एकूण दोन निविदा प्राप्त झाल्या व प्राप्त निविदा उघडण्यात आल्या असता, त्यात खालील प्रमाणे दर भरून प्राप्त झाले.

| | | |
|---|---|---|
| 1. | मे. शहा कन्स्ट्रक्शन | **18.15% कमी दराने** |
| 2. | मे. आर. के. कन्स्ट्रक्शन | **15.99% कमी दराने** |

वरील प्रमाणे प्राप्त निविदापैकी तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा 18.15% कमी दराची मे. शहा कन्स्ट्रक्शन यांची निविदा दाखल केली आहे.

तरी सदरील कामासाठी मे. शहा कन्स्ट्रक्शन यांची अं.प.दरापेक्षा 18.15% कमी दराची निविदा मान्यतेस्तव तथा विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे प्रभाग क्र. 21 नारेगांव मधील मिसरवाडी वसाती अंतर्गत खडीकरण करणेच्या कामासाठी प्राप्त झालेल्या निविदांपैकी तुलनात्मकदृष्ट्या कमी दराची व अंदाजपत्रकीय दरापेक्षा 18.15% कमी दराची मे. शहा कन्स्ट्रक्शन यांची निविदा स्विकारणेस सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. 293 :**

अतिरिक्त शहर अभियंता प्रस्ताव सादर करीत आहे की, वॉर्ड क्र.66, शिवशंकर कॉलनी अंतर्गत विश्वभारती कॉलनी, रविंद्रनगर, टिळकनगर रस्त्याचे साईड पंख्याचे खडीकरण करणे या कामाची अंदाजपत्रकीय रक्कम रू.14,94,471/- इतकी असून या कामासाठी निविदा मागविल्या असता एकूण पाच निविदा विक्री झाल्या व निविदा स्विकृतीच्या अंतिम तारखेपर्यंत एकूण पाच निविदा प्राप्त झाल्या असून प्राप्त निविदांचे दर खालील प्रमाणे आहेत.

| | | |
|---|---|---|
| 1. | एस. बी. कन्स्ट्रक्शन | 31.65% कमी दराने |
| 2. | उदय इंजिनिअरींग वर्क्स | 24.99% कमी दराने |
| 3. | आर. के. कन्स्ट्रक्शन | 21.86 % कमी दराने |
| 4. | श्री हनुमान मजुर सहकारी संस्था | 16.60% कमी दराने |
| 5. | तुषार कन्स्ट्रक्शन | 12.10% कमी दराने |

तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी दर एस. बी. कन्स्ट्रक्शन यांचे असून त्यांच्या निविदेचे दर अंदाजपत्रकीय दरापेक्षा 31.65% कमी असे आहेत. करीता त्यांची निविदा स्विकारणेच्या मंजुरीस्तव तथा विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वॉर्ड क्र. 66, शिवशंकर कॉलनी अंतर्गत विश्वभारती कॉलनी, रविंद्रनगर, टिळकनगर रस्त्याचे साईड पंख्याचे खडीकरण करणे या कामासाठी प्राप्त झालेल्या निविदांपैकी तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा 31.65% कमी दराची एस.बी. कन्स्ट्रक्शन यांची निविदा स्विकारणेस मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. 294 :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, वॉर्ड क्र.3 मधील एसबीओए शाळे मागील खुल्या जागेत क्रिडा संकुल, खेळाचे मैदान विकसीत करणे व प्रभाग क्र.3 यादवनगर येथे एसबीओ शाळेच्या मागील जागेवर क्रिडा संकुलासाठी हॉल बांधणे या कामाकरीता सा.बां. विभाग सन 2006-07 च्या जिल्हा दरसुची नुसार रक्कम रू.42,85,822/- चे अंदाजपत्रक तयार करण्यात आले असून त्यास सर्वसाधारण सभेचा ठराव क्र.1062/9 दि.20.9.2007 अन्वये मान्यता दिलेली आहे.

त्यानुसार उपरोक्त कामास्तव निविदा मागविण्यात आल्या असता एकुण 5 निविदा विक्री झाल्या व 5 निविदा दर भरून प्राप्त झाल्या. त्याचा तुलनात्मक तक्ता खालील प्रमाणे.

| | | |
|---|---|---|
| 1. | न्यु स्टार कन्स्ट्रक्शन कंपनी | 14.88% कमी दराने |
| 2. | गोसावी एस. के. | 7.91% कमी दराने |
| 3. | कोहीनुर कन्स्ट्रक्शन | 5.50% कमी दराने |
| 4. | असेण्ड कन्स्ट्रक्शन | 1.54% कमी दराने |
| 5. | ड्रिमलँड कन्स्ट्रक्शन | 4.50% जास्त दराने |

तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी दराची निविदा म्हणजेच अं.प.दरापेक्षा 14.88% कमी दराची निविदा न्यु स्टार कन्स्ट्रक्शन कंपनी यांची प्राप्त झालेली आहे. सदरील निविदा स्थायी समिती समोर सादर करणेस्तव मा.आयुक्त यांनी शिफारस केलेली आहे.

त्यानुसार न्यु स्टार कन्स्ट्रक्शन कंपनी यांची अं.प.दरापेक्षा 14.88% कमी दराची निविदा प्रस्ताव मान्यतेस्तव विचारार्थ सादर.

**<u>ठराव :</u>**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे वॉर्ड क्र.3 मधील एसबीओए शाळे मागील खुल्या जागेत क्रिडा संकुल, खेळाचे मैदान विकसीत करणे व प्रभाग क्र.3 यादवनगर येथे एसबीओ शाळेच्या मागील जागेवर क्रिडा संकुलासाठी हॉल बांधणे या कामाकरीता प्राप्त झालेल्या निविदांपैकी तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा 14.88% कमी दराची न्यु स्टार कन्स्ट्रक्शन कंपनी यांची निविदा स्विकारणेस मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**<u>विषय क्र. 295 :</u>**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, चिकलठाणा येथील आरोग्य केंद्राचा परिसर विकसीत करण्याकरीता सा.बां. विभागाच्या जिल्हा दरसूचीनुसार रक्कम रू.23,50,000/- चे अंदाजपत्रक तयार करण्यात आले असून सदरील अंदाजपत्रकास सर्वसाधारण सभेने ठराव क्र.1061/8 दि.20.9.2007 रोजीच्या बैठकीत मान्यता दिलेली आहे. त्यानुसार सदरील कामास्तव ई-निविदा विभागामार्फत निविदा मागविण्यात आल्या असता निविदा विक्रीच्या अंतिम तारखेपर्यंत एकूण 4 निविदा विक्री झाल्या व 4 निविदा दर भरून प्राप्त झाल्या. त्याचा तुलनात्मक तक्ता खालील प्रमाणे.

| | | |
|---|---|---|
| 1. | मोना कन्स्ट्रक्शन | 18.48% कमी दराने |
| 2. | उदय इंजिनिअरींग वर्क्स | 18.18% कमी दराने |
| 3. | काझी म. फारूख म. इस्माईल | 14.99% कमी दराने |
| 4. | तुषार कन्स्ट्रक्शन | 12.10% कमी दराने |

तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी म्हणजेच अंदाजपत्रकीय दरापेक्षा 18.48% कमी दराची निविदा मोना कन्स्ट्रक्शन यांची प्राप्त झालेली आहे. त्यास मा.आयुक्त यांनी स्थायी समितीकडे सादर करणेबाबत शिफारस केलेली आहे.

त्यानुसार मोना कन्स्ट्रक्शन यांची अंदाजपत्रकीय दरापेक्षा 18.48% कमी दराची निविदा प्रस्ताव मान्यतेस्तव तथा विचारार्थ सादर.

**<u>ठराव :</u>**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे चिकलठाणा येथील आरोग्य केंद्राचा परिसर विकसीत करण्याकरीता प्राप्त झालेल्या निविदांपैकी तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा 18.48% कमी दराची मोना कन्स्ट्रक्शन यांची निविदा स्विकारणेस सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. 296 :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, स्थायी समिती दिनांक 18.9.2007 रोजी विषय क्र.129 अन्वये वॉर्ड क्र.17 मधील विविध गृहनिर्माण संस्थामधील अंतर्गत रस्त्यावर पेव्हर ब्लॉक बसविणेच्या कामासाठी तयार करण्यात आलेल्या रक्कम रू.11,30,500/- च्या अंदाजपत्रकास मान्यता मिळाली असून त्यानुसार सदर कामासाठी निविदा मागविण्यात आल्या असता एकूण चार निविदा प्राप्त झाल्या असून त्याचा तपशील खालील प्रमाणे आहे.

| | | |
|---|---|---|
| 1. | शेख सलीम मोहियुद्यीन | 27.86% कमी दराने |
| 2. | राणा कन्स्ट्रक्शन | 25.51% कमी दराने |
| 3. | आदीनाथ कन्स्ट्रक्शन | 21.61% कमी दराने |
| 4. | टेंभुर्णीकर प्रल्हाद सुरेश | 21.00% कमी दराने |

तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी दराची व अंदाजपत्रकीय दरापेक्षा 27.86% कमी दराची निविदा शेख सलीम मोहियुद्यीन यांची असून सदर निविदा मान्य करणे योग्य. करीता प्रस्ताव विचारार्थ तथा मान्यतेस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे वॉर्ड क्र.17 मधील विविध गृहनिर्माण संस्थामधील अंतर्गत रस्त्यावर पेव्हर ब्लॉक बसविणेच्या कामासाठी प्राप्त झालेल्या निविदांपैकी तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा 27.86% कमी दराची शेख सलीम मोहियुद्यीन यांची निविदा स्विकारणेस सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. 297 :**

अतिरिक्त शहर अभियंता, महानगरपालिका औरंगाबाद प्रस्ताव सादर करीत आहेत की, रामतारा कॉलनी, ज्ञानेश्वरनगर, मित्रविहार कॉलनी व उल्कानगरी अंतर्गत रस्त्याचे पुनःर्डांबरीकरण करणे या कामाचे अंदाजपत्रक सा.बां. खात्याच्या सन 2006-07 च्या दरसूचीनुसार तयार करण्यात आले असून त्यानुसार कामाची अंदाजपत्रकीय रक्कम रू.13,97,000/- इतकी आहे. सदरील अंदाजपत्रकास मा.आयुक्त यांची प्रशासकीय मान्यता झाली असून या कामाचा खर्च खालीलप्रमाणे उपलब्ध तरतुदीमधून प्रस्तावित आहे.

| | | |
|---|---|---|
| 1. | उल्कानगरी गायकवाड क्लासेस परिसरात रस्त्याचे पुनःर्डांबरीकरण करणे (पृष्ठ क्र.157 अ.क्र.23) | 5.00 लाख |
| 2. | रामतारा कॉलनी अंतर्गत रस्त्याचे पुनःर्डांबरीकरण करणे (पृष्ठ क्र.157 अ.क्र.24) | 5.00 लाख |
| 3. | वॉर्ड क्र.87 उल्कानगरी परिसरात रस्त्याचे डांबरीकरण करणे (पृष्ठ क्र.181 अ.क्र.34) | 4.00 लाख |
| | कामासाठी उपलब्ध तरतुद(5.00+5.00+4.00) | **14.00** लाख |

सदरील काम रामतारा कॉलनी, ज्ञानेश्वरनगर, मित्रविहार कॉलनी व उल्कानगरी अंतर्गत रस्त्याचे पुनःर्डांबरीकरण करणे या कामाचा समावेश आहे. करीता अंदाजपत्रक मान्यतेस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे रामतारा कॉलनी, ज्ञानेश्वरनगर, मित्रविहार कॉलनी व उल्कानगरी अंतर्गत रस्त्याचे पुनःर्डांबरीकरण करणे या कामासाठी तयार करण्यात आलेल्या रक्कम रू.13,97,000/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. 298 :**

कार्यकारी अभियंता(ज.नि.,वि.इ. व उ.) महानगरपालिका, औरंगाबाद यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, शहरातील मुख्य रस्त्यावरील 250 वॅटच्या सोडीयम व्हेपर फिटींग काढुन त्या ठिकाणी BOT तत्वावर एनर्जी सेव्हींग फिटींग लावण्यात आलेल्या आहेत. निघालेल्या जुन्या एकुण 4000 फिटींग निविदाद्वारे विकण्यासाठी वर्तमानपत्रात जाहीरात प्रसिध्द करून दर मागविण्याबाबत प्रशासकीय मान्यता

मिळालेली आहे. महानगरपालिकेच्या फायद्याच्या (जास्तीत जास्त दर देणाऱ्या) देकारास प्राधान्य देवुन साहित्याची विल्हेवाट लावण्यात येईल.

करीता 250 वॅट जुन्या फिटींग वर्तमानपत्रात जाहीरात देऊन विकण्यासाठीचा प्रस्ताव मान्यतेस्तव व विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे शहरातील मुख्य रस्त्यावरील 250 वॅटच्या सोडीयम व्हेपर फिटींग काढुन त्या ठिकाणी BOT तत्वावर एनर्जी सेव्हींग फिटींग लावण्यात आल्यामुळे निघालेल्या जुन्या एकुण 4000 सोडीयम व्हेपर फिटींग निविदाद्वारे विकण्यासाठी वर्तमानपत्रात जाहीरात प्रसिध्द करून विकण्यास सर्वानुमते स्विकृतीसह मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

राष्ट्रगीतानंतर सभा संपल्याचे मा.सभापती यांनी घोषीत केले.

**नगर सचिव**

महानगरपालिका औरंगाबाद